"आपले मंडळ"

|| *Maharashtra Mandal of Detroit* ||

SEPTEMBER 2018



# स्नेहबंध

## गणपती विशेषांक




# The N. Rachmale Foundation

**Prosperity Through Service**

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

LHG Lakeshore Healthcare Group

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# अनुक्रमणिका



| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्षीय | अनघा हुपरीकर | पान 4 |
| २ | कन्फ्युज्ड कोण?? आहे खरं कन्फ्युजन.... | संजय मेहेंदळे | पान 5 |
| ३ | घोडा, नाकतोडा आणि मुंग्यांची अंडी | नितीन अंतुरकर | पान 7 |
| ४ | Our Pawsome Life! | Shashwati Kinikar | पान 11 |
| ५ | उच्चशिक्षण आणि उदरभरण | ऋतूज देशपांडे | पान 15 |
| ६ | बावळे दिवस | सिद्धार्थ शास्त्री | पान 18 |
| ७ | आठवणींच्या झुल्यावर | सौ. स्वाती संजय कर्वे | पान 25 |
| ८ | Kashish | Amit Deshpande | पान 26 |
| ९ | माझी ट्रॅफिक तिकीट गाथा | शीतल सोनार | पान 28 |
| १० | मजला स्मरतील काय.. | वेदांती पारगांवकर | पान 33 |
| ११ | JIVAN ME EK BAAR AANA JAIPUR.........with your children | Sushama Sukhtankar | पान 34 |
| १२ | पाऊसखुणा - पण ओल्या | शरद घाटपांडे | पान 38 |
| १३ | ती आणि तो | पल्लवी सप्रे | पान 39 |
| १४ | भारत दौरा - टप्पा क्र. २ | सौ. सरोज प्रशांत जावकर | पान 42 |
| १५ | आम्ही नातवंडांकडून काय शिकलो ? | सौ. वसुधा टाकळकर | पान 44 |
| १६ | माझा आनंदाचा ठेवा | मृणालिनी कर्वे | पान 46 |
| १७ | माझे जीवनच आहे रास्त | सुमित्रा आष्टीकर | पान 47 |
| १८ | सोवळ्यातले सनदी अधिकारी | बाळकृष्ण पाडळकर | पान 49 |

# अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,



**तुम्हाला सर्वांना गणपतीच्या हार्दिक शुभेच्छा!!**

लहानांपासून मोठयांपर्यंत सर्वजण ज्याची आतुरतेने वाट बघत असतात तो आपला सण म्हणजे 'गणेशोत्सव'!! गणेशचतुर्थीपासून ते गणपती विसर्जनापर्यंत दहा दिवस म्हणजे नुसती मज्जा......अत्यंत उत्कृष्ट आरास केलेले सुंदर गणपती, कुटुंबासमवेत तसेच मित्रांबरोबर रोजची आरती, मोदक, ढोल-ताशांचा गजर...सगळं कसं एकदम हवंहवंसं!! पुण्याहून मिशीगनला जेंव्हा आम्ही आलो तेंव्हा वाटलं हे सगळं miss होणार की काय.. पण जेंव्हा महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईटचा गणपतीचा कार्यक्रम पहिल्यांदा attend केला तेंव्हा परदेशात असूनही मायदेशात असल्यासारखं वाटलं. गणपतीची स्थापना, पूजा, आरती, प्रसाद, गोडाचं अस्सल महाराष्ट्रीय जेवण आणि मुख्य म्हणजे लोकांमधला तोच सळसळता उत्साह; सगळं अगदी तसंच! MMD गणपतीशी माझं नातं जरा जवळचंच. २०१३ मध्ये मंडळाची सदस्य झाल्यानंतर प्रोग्रॅम मॅनेजर म्हणून MMD चा जो पहिला कार्यक्रम मी केला, तो म्हणजे गणपती.. आणि आज २०१८ मध्ये त्याच आपल्या गणपतीच्या स्नेहबंध मध्ये अध्यक्षीय लिहिताना खरंच मनापासून छान वाटतंय.

दरवर्षीप्रमाणेच आजही ढोल ताशाच्या गजरात श्रीगणेशाची स्थापना होणार आहे. त्याचप्रमाणे आपल्यासमोर सादर होणार आहे exclusive kids show. सुमारे शंभरहून अधिक मुलं वाट बघतायत स्टेजवर जाऊन परफॉर्म करायची. कला सादर करणारीही मुलंच आणि त्याचबरोबर कार्यक्रमाचं सूत्रसंचालन, बॅकस्टेज अशा जबाबदाऱ्या सांभाळायला आपल्या volunteers ना मदत करणारीही आपली मुलंच! नंतर पुरणपोळीचं जेवण आणि पुन्हा ढोल-ताशाच्या गजरात गणपती विसर्जनाची मिरवणूक. अशा या संपूर्ण कार्यक्रमात आपण सर्वजण अत्यंत उत्साहाने सहभागी व्हाल यात शंकाच नाही.

गणपतीनंतर या वर्षातले आपले अजून दोन मोठे कार्यक्रम बाकी आहेत; कोजागिरी (दिनांक १३ ऑक्टोबर) आणि दिवाळी (दिनांक ११ नोव्हेंबर). त्याबद्दल सविस्तर माहिती लवकरच सर्वांना ई-मेल आणि फेसबुकद्वारे कळवली जाईल. Stay tuned...!!

नेहमीप्रमाणेच, तुम्हाला काहीही प्रश्न असतील, सूचना असतील, तर त्या मला जरूर कळवा.



आपली विश्वासू,

**अनघा हुपरीकर**

**अध्यक्ष**

महाराष्ट्र मंडळ, डेट्रॉईट २०१८

## कन्फ्युज्ड कोण?? आहे खरं कन्फ्युजन....

"मुलांनो, काका-काकू निघालेत.... नमस्कार करा त्यांना." आपण मुलांना सांगत असतो. मुलं नमस्कारासाठी वाकताहेत तेव्हढ्यात काका-काकू मनाचा मोठेपणा दाखवत "अरे राहू देत..." म्हणत त्यांना थांबवतात.... आपली पोरं गोंधळलेल्या चेहेऱ्याने एकदा आपल्याकडे, एकदा काका-काकूंकडे पाहात राहतात.

आपल्याकडे आलेले पाहुणे आणि आपण रेस्टॉरंटमधे जेवायला गेलेलो असतो. खेळीमेळीत, गप्पा मारत जेवणं होतात. नंतर बिल आल्यावर आम्ही देतो.... नको नको आम्ही देतो.... करत आपल्यात आणि पाहुण्यांच्यात बिलाची रस्सीखेच चालते.... आपली पोरं गोंधळलेल्या चेहेऱ्याने एकदा आपल्याकडे, एकदा पाहुण्यांकडे पाहात असतात.

ABCD या लेखावर विचार करतांना मुलांच्या गोंधळलेपणाला पालकच, विशेषतः अमेरिकेत आलेले पहिल्या पिढीचे पालक, बऱ्याचदा जबाबदार असतात असं वाटून गेलं. तसंच ते बरंचसं मुलांच्या वयावरही अवलंबून असतं. ही मुलं मोठेपणी, स्पष्ट शब्दांत सांगायचं झालं तर, 'बनेल' होतात. बाहेर त्यांना वागायचं तसंच वागतात आणि घरात आईबाबांना अपेक्षित असं वागतात.... काका-काकूंना 'पाय लागू' च्या ऐवजी 'गुडघा लागू' म्हणता येईल इतपतच वाकून नमस्कार करतात.... आणि मग काका-काकू पण त्यांना कौतुकाने hug देतात. असो! तो एक वेगळाच विषय होईल....

नुकत्याच भारतातून आलेल्या पहिल्या पिढीच्या डोक्यातल्या थोर भारतीय परंपरेच्या कल्पना अजून पक्क्या असतात; मुलंही अजून लहान असतात. घरी असतात तोपर्यंत; विशेषतः डे-केअर मधे जायच्या आधी, बाहेरचं वारं अजून लागलेलं नसतं. तेंव्हा कसं सारं आलबेल असतं. मराठीत विचारलेल्या प्रश्नांना मराठीतच उत्तर येत असतात, मोठ्यांना, देवाला नमस्कार होत असतात, गाडीत पाय खाली सोडून बसत असतात. सणवार माहीत असतात, चतुर्थी-उपास माहित असतात. काहीसुद्धा confusion नसतं.



मुलं मोठी होतात. शाळेत, डे-केअरमधे, घराच्या बाहेर जाऊ लागतात; आणि मग त्यांचं आणि पर्यायाने आपलं confusion वाढायला लागतं. हाताइतकाच पायही महत्वाचा; पण 'हात लागलेला' चालतो मग 'पाय लागलेला' का चालत नाही? 'पाय लागणे' आणि 'लाथ मारणे' या दोन गोष्टी वेगळ्या असल्यातरी चुकून पाय लागला तरीसुद्धा नमस्कार का करायचा? गाडीत जरा पाय पसरून, म्हणजे अssस्से ग्लोव्ह-बॉक्स वर पसरून का बसायचं नाही? चिकन चालतं, मग बीफ का चालत नाही? जीव काय फक्त गाईलाच असतो; चिकनला नसतो?? अशा प्रश्नांची उत्तर देता देता आपण टेकीला येतो. चूक त्यांची नसते.

आपण आपल्या चॉइसने 'आपला' देश सोडून इकडे आलेलो असतो; आणि मुलांसाठी तर हा 'त्यांचा' देश असतो. घरात एक आणि बाहेर एक अशा विसंगतीत त्यांनी सुसंगत वागावं अशी अपेक्षा ठेवत आपण चिनीमातीच्या कपबशींच्या बाजारात अट्टाहासाने आपलं कुंभाराच्या चाकावरचं मडकं ठेवून ते एकरूप व्हावं असं बघत असतो. बऱ्याचशा गोष्टी आपण आपल्या लहानपणी संस्कृती, रीती-रिवाज, आईबाबा सांगतात म्हणून; त्यामागचा कार्यकारण भाव लक्षात न घेता अंगिकारलेल्या असतात. काही गोष्टी केवळ रूढी-परंपरा म्हणून स्वीकारलेल्या असतात. रामरक्षा, अथर्वशीर्ष आपल्याला 'पाठ' असतं; पण अर्थ सांगता येत असतोच असं नाही. परवचा, पाढे धडाधड पाठ म्हटलेले आपण; आजकालच्या कॅल्क्युलेटर, कॉम्प्युटरच्या जमान्यातील मुलांना ही घोकंपट्टी, पाठांतर कशासाठी करायचं हे सांगतांना आपणच confuse झालेलो असतो. गुगल आणि विकीच्या दिवसांत, विशेषतः साऱ्यांचाच attention span कमी झालेला असतांना, स्मरणशक्ती वगैरे गोष्टी त्यांना, AAA चे नकाशे जसे GPS च्या आगमनानंतर पुढे आपल्यालाही कालबाह्य वाटू लागले, तश्या वाटायला लागतात. अर्थात आपल्या आठवणींतला भारत केंव्हाच मागे पडलाय, बदललाय. इकडे जन्मलेल्या मुलांना ABCD म्हणण्यात तसा काहीच अर्थ उरलेला

नाहीये. भारतातसुद्धा पाश्चात्यांचं चालणारं नसत्या बाबतीतलं अंधानुकरण, ते करतांना झालेलं नवीन पिढीचं 'गोंधळलेलं'पण, जुन्या संस्कृतीशी तुटलेली नाळ, आपल्या पिढीची नव्या-जुन्याचा समन्वय सांधतांना होणारी तारेवरची कसरत आणि गोंधळ.... जुनी पिढी आपल्या कोषातून सहज बाहेर पडत नाही आणि नवीन पिढी कायमच oh, I know that च्या थाटात!




एबीसीडींच्या पुरतं बोलायचं झालं तर; दोन खोल्यांच्या घरात, काटकसरीने संसार केलेल्या आईबापांची आपण मुलं; आज आपल्या पाच-सहा बेडरूम्सच्या, दुमजली घरात आपल्या मुलांना जेंव्हा "काटकसरीनं राहावं", "पानात काही टाकू नये", "आमच्या वेळी असं नव्हतं" अशी वाक्य ऐकवतो; तेंव्हा ती confuse नाही होणार, तर काय होणार???

**- संजय मेहेंदळे**



## घोडा, नाकतोडा आणि मुंग्यांची अंडी

माझ्या खादाडीचा प्रवास अर्थातच माझ्या आईच्या आणि आजीच्या कुशीत सुरु झाला. कोंड्याचा मांडा करून साध्या साध्या खाण्याच्या गोष्टी अफलातून बनवण्यात त्या पटाईत होत्या. रोजची आमटी सुध्दा वेगळ्या वेगळ्या चवीची असायची! मी ती चक्क अगदी घटाघटा प्यायचो. लिंबाचं सरबत, कोबीची भाजी, फोडणीचा भात आणि गोडाचा शिरा ह्या चार गोष्टींवर मी अख्खं आयुष्य काढायला तयार असायचो आणि अजूनही आहे. (यात प्रोटीन नाही वगैरे फालतू, पादरफुसके विचार मनात सुदधा आणू नका.) आमची आजी एकदम खवय्यी. तिला रोजच्या जेवणात डावं - उजवं सगळं साग्रसंगीत लागायचं. लोणची, मिरगुंड, पोह्याचे पापड हे सगळं ती स्वतः करायची. एवढं करून बाहेरून इडलीवाला गेला तर तिला आणि तिच्या नातवंडांना इडल्या खायला घातल्याशिवाय त्याला ती पुढे जाऊ द्यायची नाही. थोडक्यात आमची चंगळ होती. आणि पास्ता, आईस्क्रीम, मॅगी नूडल्स असली थेरं अजून आमच्या आयुष्यात अवतरली नव्हती.

पण मग पायाला भिंगरी लागली. एके दिवशी मी नववीत असताना नुकतंच मिसरूड फुटलेला अकरावीतला राजू मला म्हणाला, "नितीन, आपण नुसतेच महाराज, महाराज जप करत बसतो. पण आपण रायगड बघायला पाहिजे." मी म्हणालो, "अरे, पण एसटीचे पैसे कुठून आणायचे?". राजूने मार्ग काढला. "त्यात काय, चालत जाऊ या." आई - बाबा चक्क "हो" म्हणाले (त्याकाळी प्रत्येक मिनिटाला मुलांच्या आयुष्यात ढवळाढवळ करायची पद्धत नसावी.) आणि आम्ही पाच जण प्रवासाला निघालो. सर्वात मोठा अकरावीतला राजू आणि सर्वात धाकटा सहावीतला नऱ्या! दररोज रात्री समोर दिसेल त्या घराचं दार ठोठवायचं आणि दिसेल त्या माणसाला "पथारी पसरायला जागा द्या" अशी विनवणी करायची. या प्रवासात कल्पनेपलीकडले विलक्षण सुंदर अनुभव मिळाले. अनोळखी, प्रेमळ जगाने "अगदी देव घरी आला" अशा थाटात आमचं स्वागत केलं. शेवटी आठ दिवस चालत आम्ही रायगडाला पोहोचलो. ही संपूर्ण अचाट कथा परत कधी तरी. पण त्यावेळी आयुष्यात पहिल्यांदा रस्त्याच्या कडेला स्वतः शिजवलेल्या गोष्टी खायचा प्रयत्न करायला लागला. नुसताच टोमॅटो घातलेला भात (दुसरं तोंडी लावणं काहीही नाही), शेकोटीवर भाजलेला कांदा आणि गूळ थोड्याशा आंबूस झालेल्या पावात घालून बनवलेलं सँडविच, खूप कच्ची नाही तर खूप पिकलेली फळं, असं समोर दिसेल ते खाल्लं. आणि अचानक पारंपरिक जेवणाच्या पलीकडल्या नवीन, अदभूत खादाडीच्या जगाचा शोध लागला.



त्यानंतर दहावीत असताना वाडा तालुक्याच्या अगदी दुर्गम ठिकाणी महाराष्ट्र सरकारच्या रोजगार हमी योजनेचा सर्व्हे करायला गेलो. दुष्काळातली पराकोटीची गरिबी बघितली. आदिवासी कुटुंबं झाडाची पानं खाऊन जगताना बघितली आणि मग जेवणासाठी समोर जे येईल ते गोड मानून त्यातच सुंदर चव जाणवायला लागली. कॉलेजात असताना अरुण बरोबर ९० दिवस उत्तर भारतात हिंडलो. पैसे नव्हतेच. रेल्वे प्लॅटफॉर्म वर झोपायचं, तिथेच कुठेतरी अंघोळ करायची, शहरात पायी हिंडायचं आणि रस्त्यावरचं खाणं खायचं (त्याला हल्ली स्ट्रीटफूड असं फॅन्सी नाव आहे). एखाद्या देवळात, अजमेरच्या शरीफ दर्ग्याच्या बाहेर, अमृतसरला सुवर्णमंदिरात कुठेही फुकट जेवायला मिळालं तर तसं जेवायचं. प्रत्येक गावाची, शहराची संस्कृती, भाषा, वागणूक, पेहेराव, इतिहास हे सगळं त्या गावच्या सामान्य माणसाच्या रोजच्या आहाराशी जोडलेलं आहे असं जाणवत राहिलं. आणि मग प्रवासात प्रेक्षणीय स्थळं बघण्यापेक्षा "जेवायला इथे काय खास आहे?" हे शोधण्याला प्राधान्य प्राप्त झालं.

मग सह्याद्रीतलं ट्रेकिंग सुरु झालं. एके दिवशी मजा झाली. आकाशातून पावसाचा अक्षरशः धबधबा कोसळत होता. आम्ही डोंगरात ढगांच्यामध्ये. पाच फुटावरचं सुध्दा दिसेना. बरोबर तांदूळ होता. पण बाकी काही नाही. गाव कुठे दिसेल त्याचा नेम नाही. "रात्री झोपण्यासाठी तरी छत दे रे बाबा" अशी देवाची प्रार्थना करत आम्ही गरागरा हिंडत होतो. त्या तशा धुक्यात आम्हाला एक धनगर आणि त्याचा कळप दिसला. भन्नाट बाळ्याच्या सुपीक डोक्यात एक आयडिया आली. (हा तोच वसंत

वसंत लिमये - मराठीतला सध्याचा प्रथितयश लेखक.) त्याने त्या धनगराकडून एक चक्क बकरी विकत घेतली. आणि त्या रात्री आम्ही मटण-भातावर ताव मारला. "जिवंत बकरी ते मटण" या सहा तासाच्या प्रवासाची सुरस कथा मी इथे सविस्तर सांगत नाही. पण या सहा तासांच्या अनुभवात माझं एका आहार-योग्यात रूपांतर झालं. मटण कोणत्या प्राण्याचं आहे, ते कसं बनलं असेल, त्या प्राण्याला कसं वाटलं असेल हा सगळा भूतकाळ. तो काळाबरोबर इतिहासात जमा झालेला. या मटणामुळे माझ्या पोटाचं काय होईल, उद्याच्या सकाळी माझे नैसर्गिक अनुभव कसे असतील, माझं वजन किती वाढेल किंवा कमी होईल हा सगळा भविष्यकाळ. तो अजून यायचा होता. खरा होता फक्त वर्तमानकाळ. आत्ता इथे, मटण जिभेवर ठेवलेला जो क्षण आहे तोच फक्त महत्वाचा. ती चव काय आहे, मटण शिजलं आहे का हेच फक्त काय ते खरं !! हे योगिक तत्वज्ञान खादाडीला लागू पडायला लागलं.

मी आहार-योगी झाल्यामुळे झालेले शारीरिक आणि मानसिक फायदे किती आणि काय सांगू!! १०-१२ वर्षांपूर्वी आम्ही चौघे आणि माईक-बेट्सी व त्यांची तीन मुलं (काही नाती रक्ताची असतात. काही पृथ्वीवर जमतात. माईक-बेट्सी हे आमचे पृथ्वीवरचे अमेरिकन नातेवाईक.) लडाख मध्ये हिंडत होतो. गाईड म्हणाला, "जवळच्या बौद्ध मठात त्या गावाची जत्रा आहे आज. जायचं का?" प्रवासातल्या प्रेक्षणीय स्थळांपेक्षा लक्षात काय राहत असेल तर तिथली माणसं, तिथला बाजार, त्यांच्या परंपरा! त्यामुळे आम्ही सगळे जण एका पायावर तयार झालो. पण मठ होता डोंगरावर. तिथली लोकं टणाटण उडया मारत वर चालले होते. आम्हीच सावकाश धापा टाकत चढत होतो. बाजूने एक ७०-७५ वर्षाची बाई आमच्या मागून आली. छान लडाखी पारंपरिक ड्रेस, कानात मोठया हिरव्या खड्याचे डूल. गळ्यात सुंदर पारंपरिक लडाखी दागिने. तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरसुध्दा अगदी उन्हाळी हसू अस्ताव्यस्त पसरलेलं होतं. हिंदीत तोडक्या मोडक्या गप्पा मारता मारता ती म्हणाली, "शामको चाय पिनेको हमारे घर आओ". तिने पत्ता दिला आणि तरातरा गेली की पुढे! संध्याकाळी आम्ही नऊजण तिच्या घरी पोहोचलो. त्या अगदी छोट्या गावातलं तिचं टुमदार दोन मजली घर तिच्या श्रीमंतीची जाणीव करून देत होतं. मग तिने छोट्याशा नाजूक कपात प्रत्येकासाठी चहा आणला.... त्याच्या पहिल्या घोटातच सगळ्यांचे चेहरे बघण्यासारखे झाले. कारण तो होता "याक बटर टी". थोडक्यात सांगायचं तर याकच्या दुधाचं लोणी बनवायचं आणि त्याचं शुद्ध तूप कढवायचं. त्यात थोडं मीठ आणि चहा घालायचा आणि पाहुण्यांना अगदी आग्रहाने प्यायला द्यायचा. मला हा प्रकार जबरदस्त आवडला आणि यजमानांचा अनादर न करता सगळ्या नऊ कपांमधलं ते शुद्ध तूप पिण्याचं काम आहार-योग्याकडे आलं.

असं म्हणतात की माणसाच्या हृदयाकडे जाण्याचा रस्ता पोटातून जातो. हे काही फक्त नवरा-बायकोच्या नात्यातलं गुपित नाही आहे. व्यावसायिक संबंधांमध्ये सुध्द्दा ते लागू पडतं. उत्तर मेक्सिकोत आम्ही आमच्या एका सप्लायरकडे गेलो होतो. परिस्थिती विचित्र होती. आम्हाला याच सप्लायरकडून पार्टस हवे होते. दर्जा चांगला होता. वेळच्या वेळी माल तो व्यवस्थित पुरवायचा. फक्त आम्हाला किंमत थोडी कमी करून हवी होती. पण दिवसभर वाटाघाटी करून सुध्द्दा काही तो बधेना. शेवटी सगळेजण दमून भागून संध्याकाळी एकत्र जेवायला गेलो. उत्तर मेक्सिकोतलं ते एक ऐतिहासिक सुंदर शहर. नाव होतं ग्वानाहातो (Guanajuato). आम्हाला एका महागड्या रेस्टॉरंट मध्ये नेण्यात आलं. एका सुंदर जुन्या वाड्यातल्या मधल्या आवारात (Hacienda) हे रेस्टॉरंट थाटलेलं होतं. गप्पा मारता मारता गाडी खाण्याच्या पदार्थांवर आली. मी नेहेमीच्या खाक्यात विचारलं की इथले खास पदार्थ कुठले? अतिशय अपराधी चेहेरे करून "आम्ही नाकतोडे खातो" असं त्यांनी आम्हाला सांगितलं. सबंध टेबलावर एकदम शांतता पसरली. मी म्हणालो, "त्यात वाईट काय आहे?" तेंव्हा ते म्हणाले, जगातल्या इतर लोकांना ते विचित्र वाटतं. खरं होतं. बाकी सगळी अमेरिकन मंडळी "आपण जरा दुसऱ्या विषयावर बोलू या का?" अशा थाटात माझ्याकडे बघत होते. पण मी इरेला पेटलो होतो. मग खास माझ्याकरता नाकतोडे आणण्यात आले (Chapulines). मला वाटतं ते फ्राय करून त्यांची बारीक पावडर बनवलेली होती. कारळ्याच्या चटणीसारखी दिसत होती. मी अगदी आवडीने खाल्ली. चव मस्त होती. बरोबरच्या अमेरिकन मंडळींनी पण मग ही चटणी ट्राय केली. आमचे सप्लायर मग फारच खुश झाले. ते चेकाळले. ते म्हणाले, आम्ही मोठ्या मुंग्यांची अंडी पण खातो. मग ते Escamoles पण आमच्यासाठी मागवण्यात आले. आम्हाला Caviar (म्हणजे फ्रेंच माशांची अंडी) खूपच आवडतात असं अगदी नाक वर करून म्हणायचं आणि मेक्सिकन मुंग्यांच्या अंड्यांना नाकं मुरडायची हे बरोबर नाही. तेंव्हा मेक्सिकन मुंग्यांना न्यूनगंड येऊ नये म्हणून आम्ही



Escamoles खाल्ले. मजा आली. कावळा बसायला आणि फांदी तुटायला एकच गाठ पडली आणि २-३ दिवसांनी आम्हाला कमी किंमतीत पार्टस पुरवायला मेक्सिकन मंडळी राजी झाली. पुढे जाऊन मी ही डिप्लोमसी जर्मनीत मगर खाऊन आणि जपानमध्ये साशिमी खाऊन लागू पडते आहे का तेही बघितलं.

नुकतेच आम्ही FIFA वर्ल्ड कप बघायला दक्षिण रशियाला समारा शहरात गेलो होतो. माझा मेव्हणा अमोल सध्या तिथे भारतातून काही काळाकरता एका जर्मन कंपनीत नियुक्त झाला आहे. समाराहून उझबेकिस्तान, जॉर्जिया, अझरबैजान असले देश त्यामानाने फारच जवळ. लाल बहादूर शास्त्रींचा ताश्कद करार उझबेकिस्तानातला. या कुठल्यातरी देशातले पंतप्रधान "मैं आवारा हूँ" हे राज कपूरचं गाणं गाताना Whatsapp वर बघितलेले. या देशात रानटी घोडे खूप असतात आणि घोडे हे इथलं एक मिष्टान्न असतं असं ऐकलेलं होतं. त्यामुळे शाकाहारी अमोल-अंजली-प्रज्ञा ह्यांनी आम्हाला उझबेकिस्तानच्या रेस्टॉरंट मध्ये जेवायला न्यायचं ठरवलं तेंव्हा माझ्यातल्या "मांसाहारी नितीनने" टुणकन उडी मारली. अर्थातच तिथे घोड्याचा पदार्थ मेनूमध्ये होताच. अर्थातच मी तो मागवला आणि मजेत खाल्ला. अर्थातच "नितीन कुठ्ठे कुठ्ठे नेण्याच्या लायकीचा राहिला नाही" असा अंजलीने परिचित डायलॉग मारला. योगी मंडळी निंदास्तुतीच्या पलीकडे पोहोचलेले असतात. पण यावेळी आणखी एक चांगली गोष्ट झाली. योग्यांना त्यांचं तत्वज्ञान पसरवण्याकरता शिष्य हवेच असतात. आमच्यातल्या २०-२५ वर्षांच्या चार-पाच मंडळींना ह्यावेळी दीक्षा देण्यात आली. त्यांनीही घोडा अतिशय आनंदाने खाल्ला.

गेले कित्येक वर्ष मी अंजलीच्या मागे लागलो आहे की "आपण व्हिएतनाम आणि कंबोडियाला जाऊ या. जगातलं सर्वात मोठं हिंदू मंदिर बघू या." तेजस आणि आरती जाऊन आले. त्यांनी सुध्दा तिला आग्रह केला. अंजलीचा एकच घोष, "शी, तिकडची माणसं काहीतरीच खातात". आम्ही सगळे म्हणालो, "अगं,अगदी चांगलं शाकाहारी जेवण तुला तिथे मिळेल." पण ती काही मानायला तयार नाही. हा लेख लिहिता लिहिता शेवटी माझी ट्यूब पेटली. तिला व्हिएतनाम आणि कंबोडियाच्या लोकांबद्दल तक्रार नाही आहे. मी.... तिचा नवरा, तिथे "काहीतरी" खाणार नाही याचीच तिला खात्री नाही. त्यामुळे तीने नन्नाचा पाढा लावला आहे. तेंव्हा या लेखाद्वारे मी घोषणा करू इच्छितो की "अंजली, मी व्हिएतनाम आणि कंबोडिया मध्ये अतिशय सज्जन माणसासारखा राहीन. सात्विक आहाराचं सेवन करेन." तुम्हाला पण अंजली कुठे भेटली तर तिला माझ्या वचनाची आठवण करून द्या आणि माझ्याबरोबर याठिकाणी जायचा आग्रह करा. माझी एवढी एकच नम्र विनंती.

- **नितीन अंतुरकर**




Thursday, July 11, 2019
Business Conference (My Investments and Business Plans)
Continuing Medical Education
Uttarrang (Full day dedicated for seniors)
Banquet (Dinner & Entertainment)
Fri-Sun, July 12-14, 2019
High Quality Social, Cultural, Educational and Spiritual Programs
Six Exciting Competitions
Vibrant Young Adult Track
Vendor Exhibitions
Art and Photography Exhibition
Shobha Yatra
Delicious Food Options
Donations Benefits
Donation packages range from Individual donations to Gold level donations. Benefits vary based on donation level -
Complimentary tickets
Hotel Rooms @ Discounted Rates
Complimentary Parking
Premier Lounge access for meals
Preferred Seating based on level
Sponsorship Packages
Various sponsorship packages are available for businesses to consider. Sponsorship benefits vary based on level of sponsorship -
Digital Ad Displays
Sponsor Logo on the website
Banner Displays
Hotel Room or Suite
Complimentary tickets
Booth Presence
Stage Time
and much more
BMM 2019
DALLAS - FORT WORTH
Don't miss this grand gathering of
4500+ Marathi rasiks and internationally renowned artistes/experts along with North American Marathi kalakar and achievers under one roof.
Early Bird Registration Opens in November 2018
BMM2019 DALLAS
July 11-14, 2019
at Kay Bailey Hutchison Convention Center Dallas
www.bmm2019.org
www.facebook.com/bmm2019
Reach us at contact@bmm2019.org

# Our Pawsome Life!

February 6th 2016 was the day I starts believing in 'Destiny'. We had just sent our first foster cat, Ozzie back to the Humane society. It was heartbreaking. A whooping 14 pound fluffball, Ozzie was a majestic, extremely well behaved gentleman. He went to his bedroom sharp at 8pm every night and slept on the bed until we woke him up in the morning for breakfast. He was sick with cold when we got him and although I was happy that he had recovered I was sad to see him go.

Anyway, my husband, Sushant and I had decided to take a break before taking in another foster. We wanted to get over Ozzie and also wanted to spend some time free from the responsibilities that came along with having a pet at home. Little did we know, that, while 'break' meant a full month or so to my husband, it only meant 3-4 days to me. I had just been approached by the Humane society with a list of potential adoptees and I decided to bring a 2-year-old black and white tuxedo kitty called 'Sylvester' home.

We did have a bit of an argument over why I was getting a cat so soon but since I had already committed, there was no going back. The afternoon of Saturday, 2016 I drove all the way to Detroit to pick up Sylvester.



This cat was a mess. He was exactly opposite of Ozzie. While Ozzie was strong, confident and dignified this guy was a feline representation of all that was frail and weak. He cried and complained the entire 40 minutes that took us to reach home. Once I introduced him to his room he made a mad dash for his litterbox and hid behind it. I did not even get to take a look at the mess of a cat that I had just brought home. He stayed there for 8 hours straight. Whoever said cats are dignified and proud with an air of superiority about them was quite obviously joking, I thought.

When I finally entered the room again at 11pm at night, there were 2 big green and frightened eyes staring at me from under the bed. It was then that I finally took a good look at him. He was around 8 pounds, extremely thin for his length and height. I could clearly see his joints moving up and down in a steady rhythm as he walked. His nose was covered in sores. It must have been quite tingly from all the cold and sneezing and he kept scratching it. He was long! Like, really long. Plus he was creeping instead of walking because he was so nervous, and he looked like a snake with a cat head.

I sat on the floor and held my hand out to him. Oh the relief that swept across his face! He ran to me head butting my hand and requesting me again and again to pet him. It was late and I wanted to sleep. We decided to not allow him into our bedroom but give him free access to the rest of the apartment. He did not like that at all. He was a scaredy cat and wanted to be near us. Well, the strict cat parents that we were, he was shown the door (the bedroom door of course!) and we told him firmly that we would see him in the morning. He cried and complained for half an hour. Everything went quiet after 30 minutes and we assumed he had settled down. "Where on earth is this cat!", my frantic husband bellowed in the morning! He was nowhere to be seen!! We searched our 2 bedroom apartment for an hour. Checked if I had accidentally left the door or windows open at least a 100 times. Sylvester was nowhere to be found. I almost had a heart attack! What was I to tell the Humane society? That I had lost their cat just like that? That it disappeared into thin air? Finally after an hour that seemed like a year, Sushant noticed that our couch looked different. Turns out our little monster had torn open the base of the couch and had crawled inside. It was then that I realized that our couch was literally hollow.

It was basically just wooden beams screwed together and a tout cloth stapled on it. Sylvester had totally exploited its weakness and made himself a cool hiding spot. This is what happens when you buy cheap furniture I guess!

The next few days went by fast. Although it didn't seem like Sylvester was physically abused he was definitely neglected and not loved enough. He was always on high alert. Any attempt to pet him for more than a few seconds ended up in bites and scratches. Any attempts to pick him up were promptly met by vigorous wiggles and kicks, and he would try to jump and run away as though his life depended on it. He kept hiding inside the couch. Once we had to take him to the vet and he would not come out! We literally had to turn the couch upside down and I climbed into it to retrieve him. In spite of all this he seemed to want to be close to us. He would sit by our feet on our bed at night and in general just follow us around the entire time keeping a distance. It didn't help that his illness was not subsiding. It took numerous vet visits and almost a month for his infection to clear up.When finally the day came for him to go back to the shelter we just couldn't do it. At that point, he had been with us for a month now and we had grown pretty attached to him in spite of the numerous bites and scratches. We decided to adopt him! Yay!! This is how our little fur baby got a permanent home.




I had always dreamt of getting a cat. I had already decided what sort of cat I was going to get. It was going to be an orange tabby cat - Long haired and chubby. I was going to get the cuddliest, most lovable, lap cat. He would be a purring machine and would hang around my neck or on my lap all the freaking time. Clearly, destiny had other plans. God was laughing hysterically from above as we were madly falling in love with our thin, 8 pounder, short haired, black and white, hell on wheels who was not at all touchy-feely types. His favorite pass time was to lounge on a high spot and look down on us- literally and figuratively. Although his official name would still be Sylvester, we soon ended up calling him 'Bubbie' at home.

It is amazing how much you can change with love. As weeks and months passed, Bubbie's personality blossomed and his true nature started to show. He now ruled our home with an iron paw. He became attached to the corner seat on our couch and he claimed it as 'his turf'. At any point if he wanted to sit on his favorite spot and some lowly human was already sitting there he would walk straight up to them and make eye contact. Then he would meow until they relinquished his throne. It did not matter who was sitting on his spot: Friends, family, kids, adults or random strangers. No one was spared. If he wanted it he would have it. He became the feline Sheldon Cooper. Bubbie loved to play. He could run at top speed for hours and loved to wrestle.

One fine day he expressed his desire to go out. Now mind you, most cats in the US don't go out. I get it. There are a lot of dangerous predators like cars, raccoons, coyotes around and they are much safer inside than outside. But Bubbie would sit in front of the door and complain and plead relentlessly! Finally we decided to introduce him to the outdoors. We decided that we lived in a relatively safe area with no major roads around and since we had a nice wooded spot right behind our home, Bubbie would have plenty of space to loaf around. So off he went. It was the best decision we had made. He loved it! One fine day we opened the door and in sprinted Bubbie. In his mouth he was carrying a live but unhurt baby squirrel! He came in and released the poor thing. We FREAKED OUT! I screamed and ran around the apartment like a chicken with its head cut off as Sushant and Bubbie were chasing the poor thing. Sushant-to try and catch it so that he could release it back and Bubbie- to catch it, torture it and then kill it! Finally, Sushant won and released it outside. Extreme disappointment clearly showed on Bubbie's face. This encounter with the squirrel added a valuable lesson in the database of Bubbie's brain: These

humans were talentless and worthless hunters. He then took it upon himself to provide us with our weekly ration and to keep us alive. And so began the weekly presents of dead mice, sparrows and more squirrels. Also, we mastered the art of profusely thanking him for his "presents" and quickly and efficiently shoving the unfortunate critter in a grocery bag and throwing it away in the dumpster behind Bubbie's back. Never ever did he bring a live animal home after that incident though, which, to me, was a huge relief!

Then one day the thing we dreaded the most happened! Bubbie went out and did not return that night! Neither did he return the following two nights. At that point it had been pouring for 3 days straight. It was October end and the days were cold and chilly. We were so distraught! We printed his picture and declared a reward for anyone who would return our cat to us safe and sound. No avail. 3 days after his disappearance we were having dinner one night (I was also missing him and crying) Sushant jumped up and said, "I think I hear Bubbie!" We ran to the door like two excited kids running towards an ice cream truck and opened the door. And sure enough, Bubbie made a grand entrance in the house! Visibly thin and extremely hungry but safe and in one piece! We were delighted!! Our family was complete once again!




Right after this incident we got Bubbie a GPS tracker that he had to wear on his collar every time he went out. It made a hole in our wallet but it was the best investment ever. Bubbie was never out of sight after that incident.

I can go on and on about Bubbie's antics. He had turned into this quirky lovable cat with a BIG personality. **This February we celebrated Bubbie's 4th birthday**. He has enriched our lives beyond words. This finally feels like home to him and he now considers us family. The thin boney cat has disappeared, and its place has taken by a chubby cat. His vet is nice and kind enough to call him "a little thick and well insulated" instead of FAT. This well insulated cat loves to be picked up and purrs like a drilling machine. He wakes me up in the middle of the night and demands cuddles and pets. He sleeps on me or my husband at night and LOVES to cuddle. He no longer flinches when we bend down to pet him. He loves people although he still does not let strangers touch him. He is a picky eater and every few months we have to offer him a variety of cat food of which he chooses one (ONE!) and it's usually is more expensive than the others, and then the rest is donated. He then demands the exact same food for the next few months and we breathe a sigh of relief to have proved ourselves worthy enough in Bubbie's eyes. We hope that he lives a long and happy life and will continue to provide him with the best possible that life has to offer. It was a lot of work to get Bubbie where he is now but given a chance I would make the same choices all over again.

We didn't get our 'dream' cat. But with love, patience and understanding we transformed the one that we got into our 'dream' cat. For that matter, I will say that Bubbie is even better than what we wanted in the first place! Wouldn't it be amazing if we apply the same philosophy to any other person, animal or materialistic possession! It will completely change our perspective towards life.


आपलं मन कधी कुणाबरोबर जमेल काही सांगता येत नाही. कधी माणसांची माणसांशी मनं जुळतात, आमच्या गोष्टीत माणसांची मांजराशी मनं जुळली. आपल्या स्वप्नाप्रमाणे, अपेक्षेप्रमाणे समोरची व्यक्ती असेलच असं नाही. पण एकत्र राहून, प्रेम करून ते नातं असं काही बनतं की आपल्याला स्वप्नापेक्षा सत्यच जास्त आवडायला लागतं.. आणि हे मला आमच्या बबीने शिकवलं..!

\- **Shashwati Kinikar**


Choose
Jaya Travel
It's time to turn
your dream vacation
into a reality
Lowest
fares to India.
Guaranteed!
Before you travel the world, call Jaya,
your trusted community travel partner!
Book today!
1-877-359-5292 | WWW.JAYATRAVEL.COM
JAYA
TRAVEL & TOURS

# उच्चशिक्षण आणि उदरभरण

उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला जाणार हे ठरल्यावर नवा देश, तेथील जीवनपद्धती, तेथील भाषा या बद्दल जेवढा आमच्या मनात उत्साह होता, तितक्याच तीव्रतेने 'परदेशात लेकरू काय खाईल, कसं राहील' अशी काळजी आईच्या मनात आणि 'पोरगं मांसाहार करून धर्म बुडवणार तर नाही ना?' अशी शंका बाबांच्या मनात डोकावत होती! त्यामुळे अमेरिका प्रवासाच्या आधी दोन-तीन महिने आईने वेगवेगळ्या पातळ भाज्या, फोडीच्या भाज्या, पिठले इत्यादी पदार्थ कसे करायचे याचे training sessions आयोजित केले तर बाबांनी 'आपला देश, आपली संस्कृती, आणि शाकाहाराचे फायदे' पुन्हा पुन्हा पटवून सांगण्याचे सत्र लावले होते. या sessions मध्ये सुरुवातीचे काही दिवस आम्ही खूप उत्साहाने भाग घेतला पण दोन-तीन recepies तयार केल्यानंतर मात्र उत्साह मावळला आणि सगळ्या भाज्या सारख्याच पद्धतीने केल्या जातात असा निष्कर्ष काढून आम्ही मोकळे झालो.



US ला आलो तेव्हा 'इंडियन असोसिएशन' च्या विद्यार्थ्यांनी विमानतळावर छान स्वागत केले आणि उदरभरणासाठी 'Subway' sandwitch खाण्यासाठी नेले. Subway मध्ये ठेवलेल्या वेगवेगळ्या ब्रेड्स, कितीतरी प्रकारची cheese, भिन्न भिन्न sauces, आणि दुकानदाराची व्याकरणाविहित अस्पष्ट उच्चारांची इंग्रजी हे सारे पाहून मी पुरता भांबावून गेलो. दुकानदाराच्या इंग्रजीला मी ‘अस्पष्ट’ असे विशेषण दिले कारण माझ्या मराठी शाळेतून माझ्यावर स्वच्छ उच्चारांची आणि तर्खडकरी व्याकरणात सजलेली अशी मराठींकृत इंग्रजीचे संस्कार झाले आहेत. त्यामुळे subway counter वर विचारलेल्या 'for here or to go?' मधील कर्ता-कर्म-क्रियापद कोणता? हा active का passive voice या साऱ्या व्याकरणाच्या विचारांची गुंतागुंत झाली आणि मी केवळ 'हं?' 'हं?' करत तिथे उभा राहिलो. असो. विषयांतर नको. सांगायचा मुद्दा म्हणजे, त्या subway sandwitch चा पहिला घास खाल्ला, आणि माझा अमेरिकेत येण्याचा सारा उत्साह क्षणात मावळला. त्यात मसाला तर सोडाच पण तिखट-मीठ टाकलेले नव्हते. खरंतर या आधीची चार वर्षे मी इंजिनियरिंग कॉलेज हॉस्टेल च्या खानावळीत जेवण केले होते. त्यामुळे 'आमच्या हॉस्टेल मेस मध्ये चार वर्षे खाणारा मनुष्य, जगात काहीही आनंदाने खाऊ शकतो' या माझ्या दुर्दम्य विश्वासाला subway sandwitch च्या पहिल्याच घासात तडा गेला. दादर स्टेशन समोरील पडक्या टपरीत नेहमी खाल्लेले मसालेदार grilled sandwitch कुठे आणि कुठे हे मिळमिळीत sandwich, 'कहा राजा भोज और कहा गंगू तेली' असाही मनात विचार येऊन गेला. असो. तात्पर्य- त्या दिवसापासून ‘पाककला हे स्त्रियांचे राखीव क्षेत्र’ असे मानणाऱ्या देशपांडे कुटुंबातील 'I love cooking' म्हणणारा मी पहिलाच पुरुष प्रतिनिधी ठरलो.

युनिव्हर्सिटी housing मध्ये आम्ही तीन रूममेट्स एका अपार्टमेंट मध्ये राहत होतो. मग seniors च्या सूचनेनुसार आम्ही cooking turns सुरु केले. Cooking turns म्हणजे दररोज एकाने स्वयंपाक करायचा. Cooking group चे काही अलिखीत नियम होते. ते खालील प्रमाणे:

- एका नंतर एक अशी ग्रुप मधील प्रत्येकाची cooking करण्याची पाळी येईल. emergency situation शिवाय Cooking turns चा क्रम बदलला जाणार नाही. हा नियम सर्वात महत्वाचा होता. या नियमापुढे कोणाच्याही आळसाला थारा नव्हता.
- ज्याचा आज cooking turn आहे त्याची दुसऱ्या दिवशी भांडी घासण्याची पाळी असे. याच नियमामुळे, श्रम वाचवण्यासाठी आम्हाला कमीतकमी भांडी वापरून स्वयंपाक कसा केला जाऊ शकतो ह्याची कला हस्तगत झाली.

- जेवण कसेही झाले (म्हणजे बेचव झाले) तरी कूकिंग ग्रुप मध्ये त्यास कधीच नावे ठेवली जाणार नाहीत. पण जेवतांना 'लोणचे आणि चटण्यांचा' खप वाढला की cook ने समजून घ्यावे की 'आजचे cooking फसले आहे आणि पुढच्या turn ला जास्त प्रयत्नांची गरज आहे'.
- ज्यांना तिखट आवडतं त्यांनी तिखट चटण्या आणि ज्यांना गूळमट जेवण आवडतं त्यांनी दही, सोबत घेऊनच जेवण्यास बसावे. अतिशय तिखट वा गूळमट जेवण बनवणे टाळले जाईल.
- Cooking ही turn postpone होऊ शकते पण कधीही skip होणार नाही. उदाहरणार्थ, कोणी दुसऱ्या मित्राकडे जेवायला बोलावले अथवा बाहेर खाण्याचा बेत ठरला तर cooking turn पुढे ढकलली जाई, पण परीक्षेशिवाय इतर कोणत्याही छोट्याछोट्या कारणासाठी कुणालाही 'स्वयंपाकातून सुटका' मिळणार नाही.
- कुण्या सदस्याने इतरांना घरी बोलावून potluck आयोजित केले तर त्याचे सर्व सदस्यांकडून विशेष आभार मानले जातील. कारण अशा आयोजनामुळे कमी श्रमात विविध पदार्थ खावयास मिळतात.

जरी जाचक वाटले, तरी 'समाजाचे उदरभरणाचे कार्य सुरळीत आणि नियमित चालावे' या उच्च हेतूसाठी हे नियम आवश्यक होते. काही दिवसांनी आम्हाला कळाले की बाजूच्या अपार्टमेंट मध्ये राहणाऱ्या मुलींच्या cooking group मध्ये असे नियम लागू नव्हते. असे म्हणतात, त्या ग्रुप मध्ये ' ज्या मुलीला cooking करण्याची इच्छा झाली, तिने स्वयंपाक करायचा', असा विचार प्रवाह होता. हे कळाल्यावर 'तरीही त्या ग्रुप मध्ये दररोज स्वयंपाक कसा होतो?' असा आश्चर्ययुक्त प्रश्न आमच्या मनात उभा राहिला. 'नियमरहित cooking group' या विचाराची नुसती हवा सुद्धा आमच्या ग्रुप साठी घातक आहे, असा आमचा ठाम विश्वास होता.



"Chemical engineers ought to be good cooks" हे आमच्या इंजिनियरिंग च्या प्राध्यापकांचे वाक्य आमच्या मनात पक्के भिनले होते. आम्ही तिघंही रुममेट्स chemical इंजिनियर्स होतो. स्वयंपाकाचे पात्र हे आम्हाला एका छोट्या 'chemical reactor' सारखे भासत असे. स्टोव्ह पासून कढई पर्यंत 'heat conduction', कढई ते तेल 'heat convection', तेलाचा उत्कलन बिंदू (boiling point), मोहरी जिरे कांदा लसूण यांचे वेगवेगळे 'तळण बिंदू' (frying points), त्यातही त्यांचा योग्य असा मिसळण्याचा क्रम, मसाले-धनेपूड- जिरेपूड इत्यादी 'chemical agents' च्या भाजीसोबत होणाऱ्या रसायनी क्रिया, चांगला स्वयंपाक होण्यासाठी लागणार वेळ म्हणजे ' rate of reaction', भाज्या उकडण्यासाठी वाहणारे वाफेचे pressure इत्यादी. Chemical इंजिनीरिंग मध्ये शिकलेल्या कितीतरी संकल्पना परीक्षेशिवाय कुठेतरी आम्हाला उपयोगात आल्या ह्याचा आनंद cooking करताना होत असे. मग इंजिनियरिंग च्या प्रयोगशाळेत करायचे राहिलेले प्रयोग स्वयंपाक करताना मनसोक्त केले. त्यातून झालेल्या भाज्या, वरण, पिठले कधी ---कच्चे राहिले किंवा जास्त शिजले गेले, तर त्या त्या प्रक्रियांच्या 'limits' लक्षात आल्या आसा निष्कर्ष काढत असू. आता असे प्रायोगिक तत्वावर तयार केलेल्या स्वयंपाकाची चव कशी असेल याचा अंदाज तुम्ही लावू शकता. त्यातही 'cooking is an art, it's not engineering' हे आमचे तत्वज्ञान होते. त्यामुळे स्वयंपाक करताना, मीठ- तिखट-मसाले या सारखे जिन्नस कधीच मापाने न घेता, आम्ही हे जिन्नस अगदी मनाला योग्य वाटेल त्या प्रमाणात- न मोजता- टाकत असू (हे जिन्नस मोजून-मापून टाकणे म्हणजे 'पाक' कलेचा अपमानच नाही का!). त्यामुळे आमच्या kitchen लॅब मधील प्रयोगात नेहमीच 'pinch of surprise element' असायचा. आणि तरीही कॉलेज होस्टेलच्या मेस मध्ये खाल्लेल्या जेवणाची आठवण झाली की आमच्या स्वयंपाकाची गोडी काही औरच वाटत असे. आणि खरे तर आमच्या 'कलाभिमुख (artistic)' स्वयंपाकामुळे, एकच भाजी प्रत्येक वेळेस वेगळ्या चवीची होत असे. 'त्याचमुळे भाजीचे नावीन्य जोपासले जाते' अशी आमची पक्की धारणा होती.

'येन केन प्रकारेण' जरी स्वयंपाकाची सिद्धी झाली तरी, आमच्या 'cooking group' मध्ये दक्षिण भारतीय, पंजाबी, बंगाली, Indianised अमेरिकन, Indianised chinese असे वेगवेगळे पदार्थ बनवले गेले. आम्ही तीन रूममेट्स पासून सुरु झालेला हा ग्रुप नंतर सहा सदस्यांचा झाला. सर्वांच्या आवडी, स्वयंपाक पद्धती, आणि जेवणातील घटक निरनिराळे असल्यामुळे जेवणात

खूप विविधता असे. त्यातही बंगाली पद्धत वापरून मराठी भाजी, दक्षिण भारतीय मसाले घालून उत्तर भारतीय रस्साभाजी असेही प्रयोग करण्याची संधी मिळाली. पिठले पोळी पासून ते मसालेदार पास्ता पर्यंत आणि रसगुल्ल्यापासून ते तिरामिसु पर्यंत कितीतरी पदार्थ आमच्या स्वयंपाकघरात बनवले गेले. उच्चशिक्षण घेता घेता पाककलेचे शिक्षण जणू 'बोनस मिळावे' तसे मिळाले. हळू हळू खरंच 'cooking is fun!' असे मनात कधी रुजले तेच कळाले नाही.

उच्चशिक्षण घेतांना Research lab मध्ये येणाऱ्या अनेक अडचणींना तोंड देतांना, failed एक्सपेरीमेंट्स, rejected research पेपर्स, job hunting इत्यादी तणावांना सामोरे जाताना 'cooking' हे एक तणाव दूर करण्याचे creative channel झाले होते. आमच्या स्वयंपाकाच्या कथा ऐकून, 'लेकरू काय खाईल?' या काळजीत असलेली आई पण कधी कधी भारतात गेल्यावर 'अरे तुम्ही तो पदार्थ कसा तयार केला होता ?' असे विचारात असे. एवढे मस्त vegetarian जेवण आम्ही या परदेशातही खात होतो त्यामुळे बाबांचा 'शाकाहारी' धर्म जोपासणे कठीण गेले नाही. कुकिंग ग्रुप मध्ये दररोज सोबत बसून जेवण केले आणि सोबतच हसी-मजाक आणि गप्पांचा धुमाकूळ घातला. शिक्षणासाठी घरापासून शेकडो मैल दूर आलेल्या विद्यार्थ्यांना अजून काय हवे असेल?

शिक्षण संपले, आणि युनिव्हर्सिटी च्या बाहेर आम्ही पडलो. तरी 'cooking' करताना cook केलेल्या हजारो गमती-जमती आठवणींच्या रूपात आजही मनाला गुदगुल्या करून जातात. माझ्या मते आमच्या cooking group चे नियम हे सर्वांच्याच आयुष्यात खूप महत्वाची भूमिका बजावू शकतात. उदाहणार्थ, नवे नवे लग्न झाले तेव्हा ‘नियम ३’ कुणालाही उपयोगी ठरू शकतो. (याचा अर्थ मला त्याचा उपयोग झाला असं नाही, पण एक उदाहरण म्हणून सांगितले.) सध्या बायको आणि आळी-पाळीने येणाऱ्या आई आणि सासूबाई यांनी स्वयंपाकघराचा ताबा घेतला आहे (माझ्या artistic cooking ची धास्ती घेऊन त्यांनी हा निर्णय घेतला असावा असा माझा संशय आहे). कदाचित त्याचमुळे, फावल्या वेळेत, शब्दांच्या भाजीत, आठवणी आणि कल्पनांचे मसाले मनमुराद टाकून ही special dish वाचकांसाठी करण्याची मला संधी मिळाली.

**- ऋतूज देशपांडे**


E-Registration of
Rent Agreement from
anywhere in the world
Ensure Safety, Security
of your property in
Maharastra-India
Save Time & Money
Login at
Anulom.com
Call at
+91 9595380945
+91 8600833398
support@anulom.com
अनुलोम
टेक्नॉलॉजीज् प्रा. लि

## बावळे दिवस

रामदास परांजप्यांनी वाढत्या नागपूरच्या सीमेवर पांढरपेश्या मध्यमवर्गाची वस्ती स्थापन केली, तिचं नाव होतं रामदासपेठ. इथली घरं पक्की, पण जुन्या पद्धतीची, कौलारू. इथली सांडपाण्याची व्यवस्था तशीच जुन्या पद्धतीची, अर्धी बांधलेली, पण वरतून उघडी. काही वर्षांनी वस्ती वाढल्यावर शेजारीच एक एक्स्टेंशन स्थापित झालं. या वस्तीचं नाव अर्थातच पडलं, नवी रामदासपेठ. मूळच्या रामदासपेठेला लोक आपोआपच जुनी रामदासपेठ म्हणू लागले. माझं आजोळ जुन्या रामदासपेठेंत, पायी-पायी जाण्याच्या अंतरावर होतं.

नऊवारी नेसणाऱ्या थोरलीला पाचवारी नेसणारी धाकटी बहीण असावी, तोच फरक या दोन वस्त्यांमध्ये होता. धाकट्या वस्तीतली घरं नव्या पद्धतीची, कौलांची घरं अगदीच कमी; बहुतेक घरांना तीन फूट चौथरा असलेली, सिमेंटची गच्ची. प्रत्येक घरांत वाहत्या पाण्याचे नळ. बागेसाठी अन धुणी-भांडी करण्यासाठी नीट बांधलेली अशी आवारांत एक दहा-बारा फूट खोल विहीर. आणि सगळ्यांत मुख्य म्हणजे घरांतच केलेली नित्याच्या स्नानादिक आन्हिकांची व्यवस्था; सांडपाण्याच्या भूमिगत व्यवस्थेला जोडलेली.

* * * * *

माँटेसरीच्या "laissez-faire" पद्धतीचं आमचं बालक मंदिर म्हणजे घरच्या सारखंच ऐसपैस, आणि मुख्य म्हणजे घराच्या अगदी जवळ होतं. तापलेल्या उन्हांत, जोराच्या पावसांत, किंवा कडाक्याच्या थंडीत सहज जाता-येता येईल, असं. ही शाळा म्हणजे हवी तशी धमाल करायची जागा. वाटलं तर रंगीत ठोकळे जुळवायचे, नाही तर दत्तापेटी भरायची, हवं तर वाळूने सजवलेलया अक्षरांचा कित्ता गिरवायचा, चित्रांची पुस्तकं चाळायची, किंवा खेळातल्या किसणीवर खडूचा भुगा करीत बसायचं. दोन-चार ठरलेल्या वेळा सोडल्या, तर तिथे वेळेचं बंधन नसायचं. अगदीच उतूं गेल्यासारखं वागल्यास फार तर उंच कपाटावर बसवून ठेवण्याची "शिक्षा" व्हायची. उंचावरून जगाकडे बघायला मजा यायची.



पण सगळ्यांत मोठी गम्मत म्हणजे सकाळी कधीतरी पण शाळेबाहेर दररोज हटकून होणारं "अनारकली"चं आगमन. त्या बैलगाडीला दिलेलं हे नाव निदान दोन-तीन पिढ्या जुनं असावं. अनारकली जवळ यायच्या कितीतरी आधी शाळेचा आसमंत दरवळायचा. अगदी सर्कल वर बसलो असलो तरी आम्ही आरोळ्या ठोकत गॅलरीकडे धावायचो. गेरूच्या रंगाच्या, मोठ्या झाकणाच्या, चाकं लावलेल्या लोखंडी हौदाला एक वयोवृद्ध पण प्रचंड बैल ओढायचा. बैलगाडी हाकणारा गाडीवान देखील तसाच वयोवृद्ध, निर्विकार चेहऱ्याचा स्थितप्रज्ञ. त्याच्या नाकातले संवेदन-तंतू केंव्हाच मेलेले असणार. प्रत्येक घराजवळ अनारकली थांबायची. बरबटलेली रिकामी बादली घेऊन तो गाडीवान परसदारी जायचा, आणि गेल्या दिवसभरांत जमलेला मलिदा आणून हौदांत ओतायचा. नाकं दाबत आम्ही तो नेहेमीचा सोहोळा डोळे विस्फारून बघायचो, अगदी अनारकली वळण घेऊन अदृश्य होईपर्यंत.

* * * * *

एका सुट्टीच्या दिवशी दुपारी एकटाच टिवल्या-बावल्या करत असतांना तुकाराम कोट्रीवारांच्या दुकानासमोर अनारकली अनपेक्षितपणें समोरून येतांना दिसली. "मुघले-आझम" चित्रपटांतल्या शाहजादा सलीमला मधुबालारूपी अनारकली भेटल्यावर जितका आनंद झाला असेल, त्याच्या कितीतरी पट अधिक आनंद मला झाला. काळजावर मोरपीस फिरलं.

"भंगीकाका, भंगीकाका, मी तुमच्या शेजारी बसूं का?" मी गाडीवानाला उत्साहानं हटकलं. तो नाही म्हणाला तर काय करायचं, अशी चिंता मनांत होतीच.

पण सुदैवानी कांही न बोलताच भंगीमहाराजांनी जरा बाजूला सरकून मला जागा करून दिली. इतक्या सहजपणें अनुमती मिळाल्याचा माझा आनंद गगनांत मावेना. कधी स्वप्नांतसुद्धा न बघितलेलं भाग्य माझ्या वाट्याला आलं होतं. टुणकन उडी मारून मी त्या सिंहासनावर विराजमान झालो.

रस्त्यावरून येणारे जाणारे काहीतरी सांगत होते, पण मला ते ऐकू सुद्धा येत नव्हतं. आता पुढे काय-काय अद्‌भुत घडणार आहे, आजची ही रसभरी कहाणी सांगितल्यावर शाळेतले मित्र माझ्याकडे किती आदराने पाहतील, इत्यादि विचारांनी मी अगदी भारून गेलो होतो.

तेवढ्यात दुसरा अनपेक्षित चमत्कार घडला. समोरच्या बैलानें मान मागे वळवून गाडीवानांकडे बघितलं, आणि तोंडानें एक वेगळाच आवाज काढत शेपटी उंचावली. गाडीवानानें निर्विकारपणें हात पुढे करून बैलानें दिलेला नजराणा स्वीकारला, आणि आपल्या शेजारी त्या शेणाचा गोळा थापून ताज्या गोवरीचा गोवर्धन पर्वत उभा केला!!

घरी आल्यावर ही सुरस आणि चमत्कारिक कथा मी अभिमानानी सगळ्यांना सांगितली. कुणीतरी बाहेर विहरीवर नेलं, गरजेपेक्षा जरा जास्त बादल्या अंगावर ओतून नेहेमीच्या हिरव्या “हमाम” ऐवजी लाल रंगाच्या "Lifebuoy" साबणाची आंघोळ घातली, अन नवे, स्वछ कपडे घालून मोकळं केलं.

* * * * *

त्या काळांत प्राथमिक शाळेंत सुद्धा मुलं नापास व्हायची. माझ्या तुकडीत वीस-पंचवीस पैकी सात-आठ मुलं आदल्या वर्षीची होती. फौजदार दवण्यांच्या मुलाचं तर बहुदा यत्तेतलं हे तिसरं वर्ष असावं. आम्हा बालक मंदिरांतून जेमतेम बाहेर पडलेल्यांच्या बावळटपणाकडे तो आजच्या शाहरुख खान सारखा किंचित मिस्कीलपणें बघायचा. हे सगळे वर्गबंधु वयाने आणि आकाराने आम्हा नवशिक्यांच्या तुलनेत खूपच मोठे होते. दवणे म्हणे त्याच्या वडिलांची रॉयल एनफिल्ड फटफटी लीलया चालवायचा. करकरेला तर अर्धी विजार मुळीच शोभायची नाही. त्याला उभं करून मास्तरांनी काही वाचायला सांगितलं, तर तो नाकाजवळ पुस्तक धरून वाचतांना पुढे मागे हलायचा. शब्द वाचतांना त्याचा गोंधळ व्हायचा. पण त्याला चष्म्याची गरज असेल असं ना त्याच्या घरच्यांना वाटलं असावं, ना आमच्या गुरुजींना.

वर्गांतला इतर मुलांत सहजपणें खपून न जाणारा शिरीष दिसायला खूपच वेगळा होता. करकरे, दवणे यांच्या सारखांच खूपच उंच, पण सडपातळ. त्याच्या उजळ कांतीचा रंग नागपूरकर मुलांना न शोभणारा असा गोरा-गोरा पान होता. गोरी कांती असणं फक्त मुलींनाच अलाऊड होतं, पण त्या मुभेचा फायदा एखाद-दुसरीच मुलगी घ्यायची. तर या मर्यादेचं उल्लंघन केल्याच्या पापाबद्दल की काय, देवानी शिरीषला सतत वाहणाऱ्या नाकाची शिक्षा केली होती. त्याची चेष्टा करणं अर्थातच आम्हा वर्गबांधवांचा जन्मसिद्ध हक्क होता, आणि आम्ही तो दररोज मिळवायचोच. एक दिवस त्याला हा छळ असह्य झाला. नाक बाहीला पुसत त्यानी धमकी दिली. माझी आई रशियन आहे. तिच्याजवळ दोन-दोन खरी-खुरी पिस्तुलं असतात. मी तिला तुमची नावं सांगणार.

बिच्चारा शिरीष. हात दाखवून अवलक्षण करत त्यांनी माकडांच्या हाती कोलीत दिलं होतं.
एक-एक करत सगळे वर्गबांधव आपापल्या घरच्या शस्त्रागारांची वर्णी देऊं लागले. कुणाच्या घरी गांडीव धनुष्य अन रामबाणांचे अक्षय भाते होते. कुणाच्या घरी हनुमंत आणि भीमाच्या गदा होत्या. कुणाच्या कडे झाशीच्या राणीच्या घन-गरज आणि कडक-बिजली तोफा होत्या. कुणाच्या आजोबांना ब्रह्मास्त्राचा मंत्र ठाऊक होता. भारताच्या सामर्थ्यापुढे रशियाचा काय पाड लागणार होता?

* * * * *

नवे वर्गशिक्षक मूळचे कास्तकार असावेत. आधीच विदर्भातल्या लोकांचा रंग पक्का; तो देखील शेतांवर काम करतांना नागपूरच्या उन्हाळ्यांत करपून अधिकच काळा-कभिन्न झालेला. स्वच्छ धोतर, सफेद सदरा, काळ्या किंवा फिकट

खाकी रंगाचा कोट, आणि वर सुकलेल्या घामाची झालर असलेली कोटाच्याच कापडाची टोपी, असा त्यांचा वेष. त्या काळांत वर्गांत Ceiling Fan वगैरे सुख-सोयी कुठून असणार? डोकं फार तापलं, की गुरुजी एका हातानं टोपी किंचित उचलून दुसऱ्या हातांतल्या रुमालाने टाळूवरचा घाम पुसायचे. टोपीखालचं, तुरळक केसांतून डोकावणारं, कभिन्न कांतीच्या तुलनेंत चक्क गोरं वाटणारं टक्कल बघून आम्ही कार्टी खदाखदा हसायचो. मास्तर देखील मिळालेल्या दादीनें क्षणभर सुखवायचे. मात्र शुद्धलेखनांतल्या किंवा पाढे घोकण्यातल्या चुका किंवा वर्गांत अवेळीं केलेल्या टिवल्या-बावल्या त्यांना चालायच्या नाहीत.

स्वतंत्र भारताची भावी पिढी घडवूं पाहणाऱ्या शिक्षकाचा तो सात्विक संताप असायचा की काय कोण जाणे, पण त्या संतापाचा आविष्कार झोंबणारा असायचा. कानपिळी, धम्मक-लाडू, चापट-पोळ्या वगैरे प्रसाद मिळायचं आमचं अजून वय व्हायचं होतं, म्हणून कदाचित चूक करणाऱ्याची "करकऱ्या, चड्डीच सोडीन!!" सारख्या कधीही अंमलांत न आणलेल्या धमकीनं संभावना व्हायची. बाकीची कार्टी दात विचकावुन हसायला मोकळी! बिचारा करकरे मेल्याहून मेल्यासारखा व्हायचा. त्याच्या तोतरं बोलण्यामागे अशी किती कारणं असावी, कोण जाणे. पण कुणाला तशी शक्यता सुद्धा वाटली नसावी.
तर अशा धामधुमीत ते प्राथमिक शाळेतलं पहिलं-वहिलं वर्ष कसं गेलं, हें कळलं सुद्धा नाही.
मग एक दिवस अचानक एक वेगळ्याच पद्धतीचा वर्ग गुरुजींनी घेतला. आम्हाला गडबड न करण्याची ताकीद देऊन ते काही तरी काम करत बसले. मग मध्येच एक वेगळाच प्रश्न त्यांनी विचारला. "एका शेतांत चार कास्तकार प्रत्येकी दोन-दोन बैलांचे नांगर चालवता आहेत. तर त्या शेतावर किती पाय चालताहेत?" एका पाठोपाठ एक करीत सगळ्यांना तो एकच एक प्रश्न. प्रत्येकानी वेगळं उत्तर दिलं, पण न चिडता गुरुजींनी त्यांना खाली बसायला सांगितलं. मग अस्मादिकांची पाळी. माझं उत्तर वाजवी पेक्षा खूपच मोठ्ठं असावं. गुरुजींनी नेहेमी पेक्षा कडक आवाजात खेकसून बसायला सांगितलं. तेंच उत्तर द्यायचा मग कुणालाच धीर होई ना. प्रश्नावली संपली. पुन्हा त्यांचं काम सुरु. आम्ही अस्वस्थपणें चुळबुळ करीत होतो.

शेवटी गुरुजींनी मला एकट्यालाच उभं राहायला सांगितलं. वर्षभर न झालेली संभावना आता होणार की काय? पण त्यांच्या चेहऱ्यावर नाराजी दिसत नव्हती. "सगळ्या वर्गांत या एकट्याचंच उत्तर बरोबर होतं; त्याचा पहिला नंबर आलेला आहे", त्यांनी सांगितलं. एक लाल फीत लावलेला टिनाचा तुकडा आणि कांही तरी लिहिलेला कागद माझ्या हाती दिला. सगळ्यांना त्यांचे कागद दिले. पण लाल शेपटीचा बिल्ला मात्र फक्त मला एकट्यालाच मिळाला होता.



पहिला नंबर म्हणजे काय तें नक्की कळलं नव्हतं, तरी आमची स्वारी उड्या मारत घरी गेली. आईला बिल्ला आणि कागद दिला, पहिला नंबर मिळाला म्हणून सांगितलं. आईनं कागद वाचला. "बस, इतकंच का परसेंटेज?" असं काहीसं ती स्वत:शीच पुटपुटली.

* * * * *

नव्या शाळेंत आम्ही सतरंजीवर बसायचो. समोर दोन-दोन, तीन-तीन विद्यार्थ्यांना शेजारी बसून लिहिता येईल, अशी बाकडी. ४०-५० वर्षांपूर्वी स्थापना झालेली ही शाळा संस्थापकांची दुसरी पिढी चालवायची. सगळ्याच भावंडांचा शिक्षण क्षेत्रांत दबदबा होता. शाळेच्या प्रिन्सिपालांच्या दोन मुली, आणि त्यांच्या भगिनींचा मुलगा आमच्याच वर्गांत होते. पण व्यवस्थापकांची मुलं म्हणून त्यांना कोणतीही खास सवलत मिळतांना दिसायची नाही.

प्राथमिक शाळेतला माझा पहिला जिगरी मित्र म्हणजे किशा. अकरावी पास होईपर्यंतची वर्षं शाळेंत शेजारी-शेजारी बसून, आणि नंतरची इंजिनिअरिंगची सगळी वर्षं आम्ही एकत्र अभ्यास करत काढली. त्याची थोरवी मनांत ठसवणारा, प्राथमिक शाळेतलाच प्रसंग अगदी जबरदस्त होता.

एका दिवशी पत्रं कशी लिहितात, मायना, मसुदा, शेवटी पत्रलेखकाची सही-आधीची ओळख वगैरे माहिती शिक्षकांनी दिली. वडील मंडळींचा उल्लेख नेहेमी आदरार्थी शब्दांनीच करायला पाहिजे, असं पुन्हा-पुन्हा मनांत ठसवलं. गृहपाठ

म्हणून एखादं पत्र लिहून आणायला सांगितलं. हस्ताक्षर आणि शुद्ध लेखन चांगलं आलं पाहिजे म्हणून ॲडव्हान्स मध्ये दम दिला. कुणाला लिहायचं, काय लिहायचं, याची आम्हाला मुभा होती.

किशाचं हस्ताक्षर उत्कृष्ट होतं. शुद्धलेखन व-हाडी माणसांना शोभणारं. त्याला हा गृहपाठ खूपच आवडला असावा. दुसऱ्या दिवशी त्यानी एका ऐवजी दोन पत्रं लिहून आणली. पैकी एक ठरल्याप्रमाणे मास्तरांना दिलं. आणि दुसरं त्या वर्गमित्राच्या हाती सुपूर्द करून "तुझ्या बहिणींना नेऊन दे" म्हणून सांगितलं.

दुसऱ्यांना लिहिलेली पत्रं आपण वाचायची नसतात वगैरे पाश्चात्य नियम आम्हाला कोणीच शिकवले नव्हते. त्यानी तें पत्र तिथेच वाचलं आणि सरळ नेऊन प्रिन्सिपाल साहेबांना दिलं.

पत्राचा मसुदा रोख-ठोक होता: "प्रीय लता आनी शिला यांस, सनवीवी. माझे तुम्हा दोघींवर प्रेम आहे. आपण तिघे लग्न करू. कळावे, लोभ असावा हि वीनंती. तुमचा आज्ञाधारक ..."

पत्राच्या अखेरीस शाळेच्या रजिस्टर मधलं फॉर्मल नांव वापरून किशानी सही केली होती. स्वतःच्या पहिल्या नावानंतर वडिलांच्या नावाला "राव" आणि "जी" अशा एका ऐवेजी दोन आदर-दर्शक उपाध्या लावून मग आडनाव लिहायला तो विसरला नाही.

त्याच संध्याकाळी किशाच्या घरच्या बायकांना प्रिन्सिपाल साहेबांच्या घरी त्यांच्या सौभाग्यवतींनी हळदी-कुंकवाला बोलावलं होतं. अंधारात सोबत म्हणून किशा देखील तिथे गेला. "या जावईबापू" म्हणून त्याचं स्वागत झाल्याचं ऐकिवांत आहे.

पुराणातल्या कृष्ण-कन्हय्याला त्याच्या सोळा हजार एकशे आठ बायका अन अगणित गर्ल फ्रेंड्स बद्दल कोणी नावं ठेवली नाहीत. कलियुगांत त्याचंच नाव धारण करून अवतरलेला किशा आपल्या करवी देवासारखं वागायचा निष्ठेनी प्रयत्न करायचा. वर्गांत कुणी नवी मुलगी आली, की किशा तिच्या प्रेमात पडलाच समजा. त्याच्या पहिल्या-वहिल्या प्रेमपत्राला जरा अवाजवी प्रसिद्धी मिळाल्यामुळे की काय, त्याचा पत्रव्यवहारा बद्दलचा उत्साह आटोपला असावा. गद्याची जागा आतां पद्याने घेतली होती. हिंदी सिनेमातली गाणी कानीं पडल्यामुळे त्या भाषेचा प्रेमगीतांसाठी उपयोग करणं ओघाने आलंच होतं. भिडे कन्या शाळेतली एक लाजरी बुजरी आमच्या मुला-मुलींच्या मिक्सड वर्गांत आली, अन किशातला शीघ्र-कवी जागा झाला. "ओ मेरी प्यारी, रेखा अधिकारी, ले चल तू अंबाझरी" हे त्याचं सनसनाटीखेर गीत आम्हा मित्रांना थक्क करून गेलं. अंबाझरी तलावाजवळच्या उद्यानांतल्या कर्दळीच्या फुलांच्या रंगीबेरंगी वाफ्यांभोवती रेखावाहिनी आणि किशा गोल-गोल धावताहेत, किशा त्याचं गाणं किशोर कुमारच्या थाटांत गातो आहे, अशी विविध चित्रं आम्हा मित्रांच्या डोळ्यासमोर तरळून गेलीत.

* * * * *

"घणणंण-घणणंण" असा घंटानाद करत एक प्रचंड हत्ती घरासमोरच्या रस्त्यावरून चालला होता. सोबत दाढ्या अन जटा वाढवलेले, मळक्या कफन्या घातलेले दोन-चार बैरागी होते.

गृहपाठ सोडून मी बाहेर धावलो. एक-एक करत शेजारची लहान मोठी मुलं-माणसं घराबाहेर पडून हें अप्रूप बघत होती. इतका अवाढव्य असून देखील हत्तीची चाल बऱ्यापैकी जलद होती. मध्येच एखादा कोणी गवताची पेंडी घेऊन जरा अधिक जवळ यायचा. हत्तीला चौफेर दिसत असणार. चालण्याची गती मंद न करता पुढे-मागे झुलणारी सोंड वाकडी करून तो नैवेद्य स्वीकारायचा, आणि एका घासात त्याचा फडशा पाडायचा.

मोठी माणसं घरी परतली तरी आम्ही चार-सहा पोरं हत्तीमागे ओढले जात होतो. बघता-बघता आम्ही वस्ती बाहेर आलो. नागनदीवरचा पूल देखील मागे पडला. आता आम्ही अंबाझरीच्या रस्त्याला लागलो होतो. इतक्या दूरवर घरच्यांच्या सोबतीशिवाय जायचा हा पहिलाच प्रसंग. जरा धास्ती वाटत होती खरी, पण २-४ वर्षांनी मोठी दोन ओळखीची मुलं आमच्या घोळक्यात होती. पुन्हा घरी जाऊन शेवटी काय, गृहपाठच उरकायचा ना? शाळेची वेळ कधी उलटून गेली, कळलं सुद्धा

नाही. पोटांत कावळे कोकलायला लागले, तसे एक-एक करून आम्ही भानावर आलो. हत्तीमागे जायचा उत्साह ओसरला होता. परतीचा रस्ता शोधत घरी पोचायला आणखीन दोन-चार तास लागले असावेत.

घरी पोचल्यावर काहीतरी खाल्ल्यावर जीव भांड्यात पडला खरा, पण आता शाळेसाठी चिठ्ठी कशी मिळवायची हा प्रश्न उपस्थित झाला. खरं काय तें सांगून आईचं बोलणं खायची ताकद उरली नव्हती. शेवटी मीच ती चिठ्ठी लिहून वेळ मारून न्यायचं ठरवलं.

आईचं अक्षर गुरुजींना ठाऊक असेल, म्हणून वडिलांच्या नावानं चिठ्ठी लिहायचं ठरवलं. दुसऱ्या दिवशी गुरुजींनी चिठ्ठी मागितलीच नाही. हुश्श झालं.

नंतर कधीतरी शाळेचं सामान आवरतांना आईला ती चिठ्ठी सापडली, आणि मग उलट तपासणी व्हायची तशी झाली. अशा वेळी जे जसं झालं, ते तसंच्या तसं सांगणं महत्वाचं असतं, हे त्या लहान वयांत देखील मला उमजत होतं. सांगितलं.

आईचा चेहरा पडला. पुन्हा हत्ती-बित्तीच्या मागे जाणार नाही असं कबूल करून भागतय, अशी आशा वाटायला लागते ना लागते, तेवढ्यात आईनी आणखीन एक प्रश्न विचारला.

"अन काय तुझं हें दिव्य अक्षर! तुझ्या मास्तरांना कळलं नसतं का हे तू लिहिलंयस म्हणून?"

या प्रश्नाचं उत्तर देणं सोपं होतं. माझ्या सुपीक डोक्यानी नीट विचार करूनच हा तोडगा काढला होता. आईचं अक्षर वडिलांपेक्षा कितीतरी सुंदर म्हणून आम्ही त्यांच्या हस्ताक्षरांची चेष्टा करायचो. ते आठवून मुद्दाम वाईट अक्षरांत चिठ्ठी लिहिली होती.

आईनी कपाळाला हात लावला.

* * * * *

साने गुरुजींची तीन चार पुस्तकं आणि लहान मुलांसाठी लिहिलेल्या कथा मी एव्हाना वाचल्या होत्या. त्यातल्या बहुतेक हुंडाविरोधी कथांचा सारांश एकच असायचा. गरीब बापाला पाच हजार हुंडा देण्यासाठी कर्जबाजारी व्हावं लागायचं. मग परतफेडीचे हप्ते वेळच्या वेळी न देता आल्यामुळे त्याचा अपमान व्हायचा. अपमानाचं दुःख सहन झालं नाही की वडील दारू प्यायचे. एकदा दारूला स्पर्श झाला, की ती तान्हाजी मालुसऱ्यांच्या येशवंती घोरपडीसारखी त्या गरीब बिचाऱ्या वडिलांना चिकटून बसायची, आणि दारूच्या व्यसनामुळे कर्जबाजारी होऊन वडील देशोधडीला लागायचे. हसऱ्या कुटुंबाची धूळधाण व्हायची. हुंडाविरोधी प्रचार करतांनाच दारुबंदीचाही पुरस्कार करून साने गुरुजी एक दगडांत दोन पक्षी मारायचे.

नुकतीच "बेबी सरोजा" नावाची साने गुरुजींची कादंबरी वाचली होती. मी आईला एकटं गाठलं.

"आई, माझ्या लग्नात तू दहा हजार हुंडा घ्यायचा!"

"का रे बाबा?" आईने थंडपणें विचारलं. कधी-कधी अगदी स्पष्ट गोष्टी सुद्धा तिला दिसायच्या नाहीत.

"अगं, नीनाताई अन मंजूच्या लग्नात आपल्याला पाच-पाच हजार हुंडा द्यावा लागणार नं?" माझं गणित अगदी पक्क होतं.

"बरं-बरं. अजून त्याला वेळ आहे." इतक्या मोलाच्या सूचनेकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करत ती आपल्या कामात गुंतली. मला तिचा जरा रागच आला.

जबाबदारी शब्दाची व्याख्या बालमनानी जुनीच मनांत रुजवली होती. समजा तुमच्या विजारीला चार बटणं आहेत, आणि त्यापैकी तीन तुटली. तर अशा वेळी चौथ्या बटणावर जी येऊन पडते, ती जबाबदारी. इथे तर मी एकुलतं एक बटण होतो.

सुदैवानी काही एक वर्षांनी दुसरं बटण विजारीला येऊन लागलं. माझ्यावरल्या जबाबरीचा भार अर्ध्यांनी कमी झाला. पण तोवर साने गुरुजी कुठल्या कुठे गायब झाले होते.

त्यांची जागा घेतली होती आतां बाबुराव अर्नाळकरांनी. अर्ध्या चड्डीला रेनकोटानी झाकत, पायांत गमबूट, डोक्यावर फेल्ट हॅट, नाकावर काळा चष्मा अन हातांत टिकल्यांचं पिस्तुल घेऊन मी डिटेक्टिव्ह धनंजय व्हायचो, आणि त्यांच पोशाखांतली धाकटी बहीण व्हायची छोटू!

* * * * *

असंच एकदा मी तत्वाच्या मुद्द्यावरून आईशी भांडण उकरून काढलं. "तू माझ्यावर अन्याय करतेस. माझ्यापेक्षा तुला तुझ्या मुलीच जास्त आवडतात".

आई कॉलेजांत राज्यशास्त्र शिकवायची. तिला असल्या मुद्द्यांना कसं काय तोंड द्यायचं, हें ठाऊक असावं.

"आतां काय झालं?" तिनी थंडपणें विचारलं. तिच्या थंडपणामुळे मी अधिकच वैतागलो.

"तू नीनाताईला कोणच्या शाळेंत पाठवलंस? St. Ursula मध्ये. मंजूला कुठल्या शाळेंत? Mount Carmel मध्ये. आणि मला? मला मात्र..." माझा सात्विक संताप अनावर झाला होता.

"अरे, पण तुझी शाळा तर किती चांगली आहे ..." आईनी समजूत घालायला सुरुवात केली. पण मी तिला बोलूंच दिलं नाही.

"इंग्रजी शाळांमध्ये पाठवून तू त्यांना चांगले श्रीमंत अन इंग्लंड अमेरिकेतले नवरे मिळवून देणार. तुझे जावई त्यांच्या आयांपेक्षा बायकोचं आणि तुझं ऐकणार. मला मात्र बाळबोध शाळेंत शिकून काकूबाई बायको मिळणार. ती सुद्धा माझ्या ऐवेजी तुझंच ऐकणार. म्हणजे दोन्ही बाजूनी तुझाच विजय. पण मग माझं काय?"

नुकताच कुठलासा मराठी सिनेमा बघितला होता. इंदिरा चिटणीसांची आधुनिक कैकेयी मुळीच आवडली नव्हती.

"तू म्हणशील ते खरं रे बाबा!" आईनी सपशेल माघार घेतली.

हा संवाद इथेच थांबला असतां, पुढले कितीतरी दिवस मी खुशीत राहू शकलो असतो.

पण मग आईनी हळूच प्रश्न विचारला. "तुला मी समजा Bishop Cotton, St. Joseph, किंवा St. John's मध्ये घातलं असतं, तर तुला कशी बायको मिळाली असती?"

याबद्दल तर मी विचारच केला नव्हता. अचानक मनांत धडकी भरली. नॉन-व्हेज खाणारी बायको मिळाली तर?

सपशेल माघार घ्यायची आता माझी पाळी होती. आईला वादांत हरवायचा प्रयत्न पुन्हा कधीतरी करावा लागणार होता.

* * * * *

स्वातंत्र्य-प्राप्ती आणि नंतर गांधी-वधानंतरचे दंगे धोपे आटोपल्यानंतर आम्हा बहुतेकांचा जन्म झाला. पण या दंगलींतल्या रक्तपाताच्या, अत्याचारांच्या कथा सर्वश्रुत होत्या; त्याबद्दल सगळ्यांचीच मनं पोळलेली असावी. कधी, काय अनर्थ होईल याचा आडजागी राहणाऱ्या मंडळींना धाक असायचा. एका जमातीचे लोक दुसऱ्या जमातीच्या माणसांना एकटं गाठून विवस्त्र करायचे; पुरुषाची सुंथा झाली नसली तर त्याची निर्दयपणें कत्तल करायचे वगैरे-वगैरे गोष्टी सगळ्यांनाच ऐकून ठाऊक होत्या. काही घरांतल्या कान टोचलेल्या मुलांची देखील असल्या भीतीपायी लहानपणीच सुंथा केली जायची. असा एक मुलगा आमच्या वर्गांत होता.

एका मधल्या सुट्टींत उभ्या-उभ्या सामुदायिक धार मारतांना त्याच्या या व्यंगाचं कुणालातरी दर्शन झालं, आणि ती अफलातून बातमी लगेच सगळ्या वर्गमित्रांत पसरली. नंतरच्या बऱ्याच सुट्ट्यांमधे त्याच्या शेजारची जागा पटकावून तें अप्रूप सगळ्यांनी बघून घेतलं.

आमचं कुतुहूल बघितल्यावर त्याच्याही नसलेल्या मिशीवर पीळ चढला. हें अघटित कधी घडलं, आपण त्या वेळी कसे मुळींच रडलो नाही, वगैरे सुरस आणि चमत्कारिक कथा तो दररोज अधिकाधिक तिखट-मीठ लावून सांगू लागला.

ही नवलाई सुद्धा लवकरच शिळी झाली. मग चेष्टा मस्करीला सुरुवात. आमच्या या वर्गमित्राला एक दोन शब्दांचं टोपण नाव बहाल करण्यांत आलं. पहिला शब्द होता अवयवाच्या नावाचा अपभाषिक मराठी प्रतिशब्द. दुसरा शब्द इंग्रजी भाषेतला "कट". त्याचं मूळ नाव मग बाजूलाच पडलं.

पण आता एक नवीच अडचण निर्माण झाली. हे टोपण नाव निसंकोचपणे वापरायला सोपं नव्हतं. कुणा गुरुजींनी ऐकलं तर आफत. तेव्हा पूर्ण टोपण नावाऐवजी मराठीतली अद्याक्षरं वापरावी असा प्रस्ताव कुणीतरी मांडला. तो लगेच नाकारला गेला. इतक्या महत्वाच्या अन रोमहर्षक बाबीला इंग्रजी पुस्तका सारख्या मठ्ठ शब्दानें सम्बोधायचं म्हणजे निखळ बावळेपणा. त्यापेक्षा इंग्रजींतली अद्याक्षरं काय वाईट? इंग्रजीत "कट" हा शब्द "C" या अक्षराने सुरु होतो, हें आमच्या खिजगणतींतही नव्हतं.

प्राक्तनानें आमची अडचण अनपेक्षितपणें सोडवली.

माईक स्मिथ याचा बलाढ्य क्रिकेट संघ त्या वेळी भारतयात्रा करीत होता. भारताच्या तरुण यष्टिरक्षकाने ओपनिंग बॅटस्मनची भूमिका स्वीकारून एकट्यानं अनपेक्षितपणें १९२ धावांचा डोंगर उभा केला होता. पारतंत्र्यात साहेबाच्या हाताखाली दीडशें वर्षं काढलेल्या अहिंसावादी भारतीयांना या सुसंस्कृत सूडाचं अफाट कौतुक वाटंत होतं.

तर आमच्या वर्गमित्राचं टोपण नांव ठरलं ... "बुधी कुंदरन"!

* * * * *

प्राथमिक शाळेत वर्गांतल्या मुलींशी नीट ओळख असायची. गप्पा गोष्टी व्हायच्या. नंतर मात्र आमची भांडणं होऊं लागली, अन मग माध्यमिक शाळेंतून आठवीत गेल्या-गेल्या आमचं आपसांतलं बोलणंच बंद झालं. नुकत्याच पुण्याहून वर्गांत आलेल्या मुलीच्यापायी हे असं झालं असावं असं आम्हा मुलांना वाटलं, पण अर्थातच तसं कांही नव्हतं. आम्हीच बावळट होतो.



आठव्या वर्गांत चौधरी सर General Science नामक विषय शिकवायला होते. इंग्रजी माध्यमांतून शिकायचं हें पहिलं वर्षं ! एक धडा होता Life Cycle of the Butterfly. यत्तेतल्या आम्हा बहुतेकांनी हा धडा केंव्हाच वाचला होता - चौधरी मास्तर तो कसा काय शिकवतात हे बघण्याची आम्हा दुष्टांना फार खाज होती.

शेतकरी-प्रधान संस्कृतींत वाढलेल्या आम्हा पोरांना "नको तें" ज्ञान केंव्हाच प्राप्त झालं होतं. PT चा वर्ग क्रीडांगणावर चालला असतांना गवळी त्यांच्या म्हशी आणून रस्त्यावरच्या झाडांना बांधायचे. त्यांना उजवायला एक अवाढव्य रेडा घेऊन त्याचा मालक यायचा. PT चे शिक्षक आमची परेड शक्य तितक्या दूर घेऊन जायचा प्रयत्न करायचे. पण म्हातारीने कोंबडं झाकलं, म्हणून कांही सूर्य उगवायचा थांबत नाही.

तर सुरवंट कसें जन्माला येतात हें सांगायला चौधरी सरांनी इंग्रजीत सुरुवात केली. "व्हेन द मेल अँड द फीमेल बटरफ्लाइज एन्जॉय ..." त्यांनी सुरुवात केली. मुलांत खसखस पिकली. वर्गांतल्या मुली आपलं तिकडे लक्षच नाहीं, असं दाखवण्यात व्यस्त होत्या.

सुरवंटांचं फुलपाखरांत रूपांतर होऊं घातलं होतं. पण एकाही सुरवंटाला त्याची जाणीव नव्हती.

* * * * *

**- सिद्धार्थ शास्त्री**

## आठवणींच्या झुल्यावर

दाटून येती आषाढाचे मेघ काळे
गगनात मोठे गरजती
दोन डोळ्यांच्या पापण्यांतून
थेंब पावसाचे ओघळती

शांत वारा, पाऊस धारा,
ऊन पावसाचा खेळ रंगतो
आठवणींच्या अंगणात माझ्या
मनाचा मोरपिसारा फुलतो!

लेकी बाळी येती घरा,
सण लाडात होती सारे,
आठवणींचे ते सारे सण माझ्या
मनाच्या अंगणी साजरे!

होळीच्या रंगात रंगते
राधा चिंब ओली
खेळते मग मी पण होळी
माझ्या मनाच्याच गोकुळी!

सारतो दिवस, सारतात राती,
मी आहे एकाच ठायी
पण दूर दूर देशी माहेरा माझे
मन मज वेडावून नेई!

होऊन पाखरू मन माझे
घेते उंच भरारी
अन् क्षणात जाऊन ठाकते दूर मी,
माहेराच्या उंबऱ्यावरी!

हरवून जाते, भान हरपते,
मी आठवणींचे झोके झुलते,
अश्रू कधी डोळ्यात तरळती
कधी हास्य ओठी खुलते!

अशी हरवलेली मी मनात माझ्या
हाक ऐकू येते कानी
लेकरू दारात, मजकडे पाहत,
अचानक मी येते भानी!
हळूच कवाडे बंद करुन मनाची
आनंदी माघारी येते, अन्
परत फिरुनी वेचाया कधी अमोल क्षण मी
आठवणींचे जपते!
आठवणींचे जपते!

**सौ. स्वाती संजय कर्वे**

# Kashish

"Kashish", a first of its kind multi-lingual album comprising of 2 Hindi and 2 Marathi songs, was recently launched amidst media and prominent music personalities from Bollywood. The sole singer of this album is our very own Amit Deshpande. This album was produced by Amit and Sarita Deshpande and the composer, lyricist and music director of this album is Sarita's brother Vivek Gupte. These songs were recorded at Ajivasan Sounds owned by Suresh Wadkarji in Mumbai.

Two of the songs of this album have been videgraphed. The first videographed and the most popular song "Dhund" has been released by T-Series and is now available on all channels including youtube, Gaana, Saawan and ITunes for download and play. The second song which is the title song is available on youtube and soon will be released on other channels.

The channel was also pre-launched in Pune and respected personality Sudhir Gadgil interviewed Amit and team.

CDs of Kashish are available, if interested, please write to Amit at amitpd78@gmail.com or call him at 248 227 5682.

**Links for songs**:

Search "Kashish - The Original || Amit Deshpande & Resham Walvekar || Romantic Song ||" and "DHUND (Marathi Love Song) - AMIT DESHPANDE || DHUND Video Song (Marathi) - Romantic Songs" On YouTube to watch the songs.

## Media Coverage:


12:23 AM

http://epaper.hindisaamana.com/ima

सामना

एलबम 'कशिश' लॉन्च

मुंबई। रेशम वालवेकर, अमित देशपांडे और विवेक गुप्ते द्वारा बनाए गए मराठी और हिंदी गीतों के 'कशिश' नामक एलबम को मुंबई में लॉन्च किया गया। इस दौरान सभी सेलेब्रिटीज ने मीडिया के साथ गुफ्तगू की और इस एलबम को लेकर अपनी-अपनी राय भी जाहिर की। विवेक ने कहा कि मैंने अपनी जिंदगी में रोमांटिक गानों की रचना की है। मेरी प्रेरणा बस यही थी कि मैं कुछ अच्छी रचनाएं बनाऊं। ये एलबम जिंदगी के चार चरणों को बयां करता है। रेशम ने इस मौके पर कहा कि अमित और विवेक ने इस एलबम और इसके लॉन्च के लिए काफी मशक्कत की है। गायन और अभिनय से जुड़े कम्पोजिशंस को बेहतरीन ढंग से प्रस्तुत किया गया है। हम सब पारिवारिक सदस्यों की तरह ही काम करते रहे। ऐसे में हमारे बीच तालमेल काफी अच्छा था।


तरुणाईचा 'कशिश' अल्बमचे प्रकाशन

आतापर्यंत केवळ रोमँटिक गीतांनाच चाली लावणाऱ्या विवेक गुप्ते याने प्रथमच विरहगीतांना संगीत दिलंय. त्याचे संगीत दिग्दर्शनाखालील 'कशिश' या मराठी आणि हिंदी गीतांच्या नव्या अल्बमचे लाँचिंग नुकतेच मुंबईतील द व्यू हॉटेलमध्ये पार पडले. यावेळी या अल्बमसाठी ज्यांचे मोठे सहकार्य लाभले ते रेशम वाळवेकर आणि अमित देशपांडे हेही हजर होते. याबाबत बोलताना विवेक म्हणाला, मी माझ्या आयुष्यात कधीच विरहगीतांना संगीत दिलं नव्हतं, मी आजवर फक्त रोमँटिक गाण्यांनाच चाल लावली. माझी प्रेरणा इतकीच होती की मी काही चांगल्या रचना देऊ शकेन. मात्र माझ्या मनात एक मुलगा आणि एक मुलगी अशी प्रतिमा होती. त्या दोघांनाही डोळ्यांसमोर ठेवत मी हे संगीत दिलं आणि हा अल्बम बनवला. हा अल्बम आपल्या आयुष्यातले चार महत्त्वाचे टप्पे अधोरेखित करणारा असल्याचं रेशमने स्पष्ट केलं. ती म्हणाली, अमित आणि विवेक या दोघांनी अल्बमसाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. केवळ गाणं नाही तर त्या सोबत अभिनय अशा या अल्बमला देखणेपणाने आम्ही ते प्रेक्षकांसमोर सादर केलंय.

- **Amit Deshpande**







Pillars of Strength and Character.
Premier Provider for Property and Casualty Insurance
HRTG
LISTED
NYSE
HERITAGE®
Insurance
(855) 536-2744
www.heritagepci.com
WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC.
AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.

# माझी ट्रॅफिक तिकीट गाथा

"अमेरिकेत जायचंय मग कार ड्रायव्हिंग यायला हवंय." या वाक्यांनी हुरळून गेलेले मी. कारण मी हाडाची डेअर डेव्हील, ९ वी ला असताना बुलेट शिकलेली. सगळ्या कॉलनीला आणि गावाला आश्चर्य वाटावं अशी बिनधास्त टू व्हीलर चालावयाचे मोठ्या दिमाखात!

नंतर मग अरेंज्ड मॅरेज झाले, लगेच काही उतावीळपणा नाही दाखवता यायचा. पण नवऱ्याने आणि सासूनेच फर्मान काढले ड्रायव्हिंगचा क्लास लावावा लागेल. मग काय पथ्यावरच पडले... हुर्रे!!!!क्लास लावला, शिकले ४ चाकीही! माझ्या बॅच मध्ये मला माहीत असलेल्यांपैकी मी एकटीच होते की जिने व्यवस्थित इंग्रजी ८ चा आकडा काढून २ चाकीचे आणि व्यवस्थित हाय-वे रस्त्यावर गाडी चालवून ४ चाकीचे लायसन्स मिळवलेले, लीलया सगळ्या गाड्या चालवू लागले, गल्ली बोळातून आणि पुण्यातील रस्त्यांवर. काय गर्व होता स्वतःवर!

आले अमेरिकेत, अहाहा हा, काय ते रस्ते, काय ती शिस्त!.... सुरुवातीला वाटे मी काट्याकुट्या पायवाटेवरून अचानक चिकण्या गुळगुळीत मऊ मऊ स्वच्छ डांबरी रस्त्यांवर आलेय. काय तो ओव्हरकॉन्फिडेन्स, माझा! 'भारतात गाडी चालवलेली असली की जगात कुठेही चालवता येते' हा माझा समज बराच काळ टिकला खरा! माझा ड्रायव्हिंगचा ओव्हर कॉन्फिडन्स तर तब्बल १३ वर्षे मिरवला मी.

बरं, इथे आल्यावर इथल्या नियमांप्रमाणे रीतसर ड्रायव्हिंगची लेखी आणि प्रॅक्टिकल परीक्षा दिली.
तसा माझ्या ओव्हर कॉन्फिडन्सला सुरुवातीला छोटा ब्रेक बसला तो हा की मी पहिल्या प्रॅक्टिकल परीक्षेत नापास झाले. फक्त मला रिव्हर्स घेताना एकाने हॉर्न दिला म्हणून? छ्या, काय अडाणी किंवा अगदीच बाळबोध लोक आहेत इथले परीक्षक असं म्हणून मी ते सोडून दिले. पुन्हा परीक्षा दिली आणि मिशिगन चे लायसन्स मिळवले. 😎

मग नवऱ्याबरोबर न्यूयॉर्कला, फ्लोरिडाला, स्मोकीमाउंटन, अटलांटा, अप्पर मिशिगन, सेंट लुईस, केंटकी, झालच तर नायगारा, टोरांटो अश्या सगळीकडे जिथे ड्राइव्ह करून जाऊन फिरून घेता येईल तिकडे नवऱ्याला ड्रायव्हिंगमध्ये हातभार लावू लागले. खरंतर मलाच नवरा हातभार लावतोय असे वाटावे इतपत मीच ड्राइव्ह करणार हे उघड होते. एव्हाना नवऱ्याने माझा डेव्हीलपणा बरोब्बर हेरला होता. त्याच्याही पथ्यावरच होते ते... त्याला वाचायची भयंकर आवड म्हणून महाशय सुरुवातीला ट्रीप्टेक,प्रत्येक शहराचे मोठे मॅप धरून सल्लागार बनले (ते आजतागायत आहेत... सासू नसेल इतके!)

हा! तर इतकी ड्रायव्हिंगप्रेमी, आणि बिनधास्त असलेली मी, आणि मग माझी तिकीट गाथा कशी काय बुआ सुरू झाली? पुढे वाचा आणि तुम्हीही धडा घ्याच ...

तर... सासू-सासरे २ वर्षाआड येत असत, मस्त माझ्याबरोबर फिरत, ड्रायव्हिंगच्या बाबतीत माझे कौतुक करून थकत नसत. "कुठे फास्ट पोहोचायचं असलं की मलाच हमखास ड्राइव्ह करायला लावतात" असे मित्रमैत्रीणमध्ये मीच फुशारकीने सांगत असे. "पोलीस मला कधीच पकडत नाहीत" अशी माझी पक्की खात्री होऊन बसली. एकदा तर चक्क मला स्टॉप साइनला अडवून पोलिसाने फक्त गोड वॉर्निंग देऊन सोडून दिले. आणखीन ही बऱ्याच नशिबाने पोलीस माझ्या वाट्याला फिरकलाच नाही. एव्हाना फारच सरावले होते मी.

मग एक वर्ष आई आली. आईच ती, नुसत्या काळज्या, आम्हाला शिकवलं खरं वाघासारखा डेअरिंग करायला. पण पोरांची काळजी नसेल ती आई कशी? नवरा आईला सोडायला निघाला, मी एकटीच मुलांबरोबर राहणार होते २ आठवडे, नेहमीप्रमाणे आईने सल्ला दिला, "अगं भारतात आगाऊपणा करायचीस ते ठीक होतं, इथे उगाच कारण नसताना जाऊ नकोस कुठे गाडी घेऊन एकटीने, आणि सावकाश ड्राइव्ह करत जा".. माझा ड्रायव्हिंगच्या बाबतीत

फारच इगो.. आईचे एरवी सगळे निमूटपणे (बऱ्याच बाबतीत) ऐकणारी मी उसळलेच, फर्मावलं, "अग मला १३ वर्षात एकही तिकीट मिळालं नाहीये इथे, नाहीतर छोट्या छोट्या गोष्टीत लगेच तिकिटे मिळतात", नवऱ्यालाही एकदा मिळून झालेले (अती शिस्तबद्ध असला तरी) आई बिचारी म्हणाली, "बरं बाई पण जरा दमानं घे" मी म्हटलं, "बिनधास्त राहा, तुझी लेक रेकॉर्ड करणार!"

आईला आणि नवऱ्याला सोडून मोठ्या तोऱ्यात निघाले एअरपोर्ट वरून आणि त्याच वेळी एका तुच्छ पोलिसाला मी आईला काय बोलले हे ऐकू आले की काय असेच वाटावे अगदी या थाटात आला न तो मागे "टयावं, टयावं टयावं" करत, लाल पिवळे निळे दिवे एकदम मागे येत आहेत, असे बघायचा अनुभवच नव्हता. आधी वाटले असेल कुणाला तरी पकडत, पण मग मलाच हाँक दिला तेव्हा सॉलिड टरकली.. ड्रायव्हिंग च्या लेखी परीक्षेत वाचलेले आठवले की मागे फ्लॅशिंग लाइट आला की गाडी ड्राइव्ह वे वर घेऊन थांबवायची. मग थांबले आणि मनात वाक्यांची जुळवाजुळव करू लागले, आणि आपण नक्की काय करायचे असते ते कळेना म्हणून बसून राहिले. आला एक हँडसम उंच पुरा मस्त ऑफिसर आणि मला अदबीने, "गुड आफ्टरनून मॅम! व्हाट्स गोइंग ऑन? " मी त्यालाच उलट विचारले, "व्हाय? व्हाट्स गोइंग ऑन? " त्याने खुलासा केला "यू आर ओव्हर स्पीडींग बाय टेन! " काय डोंबल कळलं नाही पण स्पीडींग कळलं म्हणजे च्यायला आज आपण सापडलोच, आत्ताच तर आईला फुशारकी मारली होती ना?...

आई ला 'अंडर एस्टीमेट' करू नये म्हणतात ना ते अगदी खरंय! (सध्या हा किस्सा मला माझ्या मुलांना ऐकवायला सॉलिड मज्जा येते.. "बघा आई पुढे शहाणपणा चालत नाही कधी " घाबरतात बिचारे! )




तर तिथून जी काही सुरुवात झालीये ना काही विचारू नका. पहिला अनुभव झाला. नवऱ्याच्या सल्ल्याने गुपचूप कोर्टात जाऊन पॉइंट्स वजा करून घेतले.. नंतर मग नवऱ्याच्या वर्क ट्रिप्स सुरू झाल्या, अगदी सफाईने सगळं सांभाळायचे... सगळं लीलया मल्टी टास्किंग करायचे पण मेल्या त्या ट्रॅफिक पोलिसांना आता माझी दया येणे बंद झाले. एकदा मी फक्त लेफ्ट टर्न घ्यायला थांबलेल्याला ओव्हरटेक केले तर इथे साहेब बसलेले मला पकडायला. त्या आधी एका पार्किंग लॉट मध्ये रिव्हर्स घेताना उगाच पोलिसाला माझी गंमत बघायला तिथे थांबायचे होते, म्हणून की काय आला आपले पैसे उकळायला. मग वाट्टेल ते चालू झाले. आणि घराजवळचा एक ऑफिसर तर ओळखीचाच झाला. चेहऱ्यावर मोठे स्मित देऊन, "ओह्ह यू अगेन! " च्यायला याच्या ना. ची टां. !😕

झाले इन्शुरन्स वाढला, नवऱ्याला तर चान्सच मिळाला मला कशी शिस्त नाहीये, वेळेची प्रायोरिटी नाही वगैरे वगैरे.. आणि मग जो मिळेल तो माझा धांदरटपणा काढू लागला. माझी स्वतःची मुलं देखील आता त्याला अपवाद नाहीत. :( मी हि जरा घाबरू लागले, कधी नव्हे ते 'कार पुलींग' करू लागले. कुठे गेली ती माझ्यातली डेअर डेव्हील? या मिशिगन च्या सगळ्या ट्रॅफिक पोलिसांनी माझ्या विरुद्ध कट रचला आहे अशी माझी समजूत झाली. 😣

उगाच नाही त्या ७ माईल रोड वर ५५ च्या स्पीड वर एकच छोटा पॅच ३० चा करून ठेवलाय. लेकीला वेळेच्या आता उचलायचाच असतं मला डे केअर मधून, नाहीतर तिथेही लेकाचे १ डॉलर एका मिनिटाला घेतात.. सगळे नुसते लुटायला बसलेत (असे मी त्राग्याने आणि इतर गमतीने म्हणून लागले)

पुढील ३, ४ वर्षात अजून १ वेळा बर्फावरून 'स्कीड' होऊन झाडाला धाडकन धडकणे, कोणीतरी माझ्यावर नाहीतर मी कुणावर तरी 'रिअर फेन्डर बेन्डर' होणे, एकदा 'पार्किंग' मधून गाडी काढताना टायर फोडणे, आरसाच तुटणे, एकदा तर

चक्क 'फायर हैड्रन्ट' ला गाडी घासली पण वेळ कुठेय थांबायला? इथे अमेरिकेतही लोकांनी मुलांच्या सर्वांगीण विकासाची काय कॉम्पिटिशन करून ठेवलीये माहितीये? मग मला ही स्पर्धेत उतरावेच लागणारच आणि स्वतःची हौस, मुलांना आवडते की नाही हा कसला फालतू विचार?.. करना पडता हैं भाई!!! त्यातून इथे आले की सगळ्यांना 'सोशिअली ऍक्टिव्ह' राहावेसे वाटते. एकटेपणा खायला उठतो म्हणून जाणून बुजून सगळी गर्दी, कामे ओढवून घ्यायची. मराठी मंडळं, नाटके, इतर मुलांच्या ऍक्टिव्हिटीज मध्ये व्हॉलेंटिअरींग, वीकएंडची गेट टुगेदर हे सगळे पण असतेच अजून त्यात! सांगायचा मुद्दा की कित्ती ठिकाणी गाडी हाकावी लागते. आणखी २ वेळा तिकीट मिळाल्यावर मी सरळ ओळीने ऑनलाईन भरून टाकली, वेळ कुठेय कोर्टा-बिर्टात जायला? पण हे लक्षात कसे येणार, की ऑनलाईन पैसे भरून टाकले तरी पॉइंट्स राहतातच.

आताच मागच्या महिन्यात पुन्हा थोडीशी घाई नडलीच. त्याचं झालं असं, की मी नवऱ्याची व्हॅन (ते धूड) फारशी चालवत नाही. त्या दिवशी काय बुद्धी झाली कोणास ठाऊक, मी प्रेमाने माझी नवी गाडी नवऱ्याला दिली आणि स्वतः व्हॅन घेऊन निघाले. एका सिग्नलला माझ्यापुढे एक गाडी थांबलेली आणि सिग्नल हिरवा झाला तरी निघेना, मी फक्त माझा पाय ब्रेक वरून काढला आणि माझ्या गाडीचे फ्रंट बंपर पुढच्या गाडीला फक्त शिवले, हो! पण झाले! माझे ग्रह अजून ताळ्यावर आलेत कुठे? 😨

पुढच्या गाडीत एक शिस्तबद्ध सीनियर बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड बसलेले. आता आजी गर्लफ्रेंड असल्याने आजोबा बॉयफ्रेंड ना थोडे साहस आणि तडफदारपणा दाखवणे जरुरीचेच होते. लगेच मला साइड ला गाडी घ्यायला लावून पोलिसांना आमंत्रण. आला माझा "मित्र" (ऑफिसर) लगेच! :(

तो येईपर्यंत नटून थाटून आलेली आजी गर्लफ्रेंड बाहेर आली, मला तर रडूच कोसळले, काय चाललंय, काय माझं? विचार करू लागले. ऑफिसर ने माझ्याकडं पाहिलं आणि शेवटी मनात म्हटले असावं की, "बाई गं फार पॉइंट्स होत आहेत आता कोर्टात जा"... माझ्याकडे दयेचा एक कटाक्ष टाकत तोही गेला. समोरच्या गाडीतली आजी धार्मिक होती. तिनं उगाच मला सांगितलं की आम्ही फक्त फ्रेंड्स आहोत (म्हणजे ती आणि शिस्तीवाले आजोबा हं ) मला जवळ घेऊन लगेच एक छोटीशी 'प्रेयर' म्हटली. मग आम्ही दोघींनी "आमेन" म्हणून डोळे उघडले आणि निमूटपणे माझा इन्शुरन्स चा नंबर लायसन्स नंबर दिला आणि "मित्रा " कडून स्ट्रीट-क्रॅश चे तिकीट घेऊन बसले गाडीत. नवऱ्याला कसं तोंड द्यायचा याचा विचार करत. :(




यावेळी मग कोर्टात जायचे ठरवले. मग गेले, तिथे पैसे भरा, नाहीतर तारीख घ्या म्हणे.. सुबुद्धीने तारीख घेतली. २ आठवड्याने सांगितलेल्या वेळेत गेले. वर लिहिलेली माझी सगळी बिझी असण्याची कारणे कोर्टातल्या वकिलांना नेहमीची झालीये असावी. माझी ३, ४ वर्षातली "प्रगती" पाहून, (मी इतकी मस्त ड्रेस घालून चांगली प्रोफेशनल दिसावे म्हणून कोट वगैरे आणि ऑफिस चा बॅज अडकवून गेलेले, तरी) मेला खेकसला, "वि ह्॑व अ प्रॉब्लेम हिअर, मॅडम! व्हाट्स गोइंग ऑन? "... डोळ्यात पाणीच आले. अचानक मला पूर्वायुष्य आणि डेअर डेव्हीलपणाआठवला..

माझ्यातली आई, करिअर वूमन, बायको सगळं बाजूला ठेवून कळवळून माझी ड्रायव्हिंग ची आवड/ 'हिस्टरी' सांगितली.. त्याला म्हणाले, "बघा मी १४ व्या वर्षांपासून ड्राइव्ह करतेय आणि त्यानंतर १३ वर्षे पर्फेक्ट ड्राइव्ह रेकॉर्ड आहे आणि आताच असे होतेय. मी माझ्याकडून नीटनेटका ड्राइव्ह करण्याचा प्रयत्न करतेय हो, आता काहीतरी उपाय तुम्हीच सांगा. " "हमम", त्याने विचार केला. मला एक ऑनलाईन कोर्स कर असे सांगितले, कागदावर ऑनलाईन साईट चे नाव लिहिले आणि माझ्याकडे देऊन कोर्टरूम मध्ये जज्ज कडे पाठवले...

कोर्टात सगळ्यात मागच्या सीटवर बसले... देवाचे नाव घेऊन कोर्टाची पायरी कधी चढू नये म्हणतात... मला फार नाही कठीण वाटलं.. पण मनात आपली मराठी माय धाकधूक दाखवत होती.

"युवर ऑनर" आले.. "ऑल राईज" झाले. सगळे इतके शांत होते की त्यामुळेच दडपण आले. मग पहिले एकाचे नाव पुकारले. तो म्हणे अल्कोहोलच्या आहारी जाऊन गाडी चालवतो आणि अनेक वेळा दंड होऊन पण त्याची सवय सुधारली नाहीये (मी चपापले उगाच) त्याचा वकीलही होता. त्याने अर्ज केला की माझा क्लायंट खरं बोललाय आणि तो प्रयत्न करतो आहे पण सुधारत नाहीये... जज्ज नी विचारले, "काय प्रयत्न केलेस? " त्याची थोडी त त प प झाली. जज्ज ने पुढे बोलूच नाही दिले धाडकन फर्मावलेच की तुला खूप वेळा दंड झाला आहे आता काही वेगळे करायला हवे आहे तुला 'प्रिझन टाइम द्यायला हवा... कोर्टातील माझ्यासकट सगळे हादरले. मग ९ महिन्याची तुरुंगवासाची शिक्षाच फर्मावली एकदम. काय जाम घाबरले मी. (सगळं आधी च ठरलेलं असावं त्या शिवाय इतका पटकन कसा निर्णय देऊन झाला?.. मी स्वतःची समजूत घातली. )

मनात म्हटले देवा कुठे येऊन बसलेय मी.. काय करतेय? काय करायचा होत, आणि हे काय नको ते चाललंय? वगैरे वगैरे.... मग पुन्हा स्वतःचीच समजून घातली.. 'हेच असतात आयुष्यातील अनुभव यावरूनच शिकशील अजून काही', आणि स्वतःला शांत केले.

पुढे ६ जणांना एकदम बोलावले त्यात हायस्कूलचा विध्यार्थी, एक देशी माणूस, अजून २ जण साधारण ३० शी तले आणि एक ७० वर्षाच्या आसपासचे आजोबा!. असे सगळे एकदम उभे राहिले त्या कटघर्यात.. सगळ्यांना स्पीडींग चे तिकीट होते. त्या सगळ्यांना सुनावले की $१५० भरा आणि तुमचे पॉइंट माफ. वाह! जरा बरे वाटले.

तसे अजून पुढचे ५ जण, त्यांचे 'मायनर ॲक्सिडेंट' झाले होते. त्यांना ही पैसे भरा पण ॲक्सिडेंटचा शिक्का राहील लायसेन्सवर असे फर्मान.. मी पुन्हा स्ट्रेस मध्ये... 🤒

मग "शिट्याल सॉनर" अशी हाक ऐकू आली, मी गणपती स्तोत्र म्हणून संपवलेलं आणि राम राम म्हणत कटघर्यात उभी राहिले.. मला पाहून एक मिनिट थांबून सावकाश विचारले व्हॉट इस युअर नेम? मी म्हटलं "शीतल सोनार", मग अजून एक मिनिट काहीतरी वाचत होता.. मी म्हणाले काय शोभा करतो काय माहीत माझी.?. म्हणून खाली मान घालून होते... मग म्हणाला यू आर रेकमेंन्डेड ऑनलाईन कोर्स अँड यू नीड नेक्स्ट डेट, व्हेन डू यू वॉन्ट इट? आफ्टर १, २ ऑर ४ विक्स? मी म्हणाले १ प्लीज! मग जज्ज म्हणाले ओके वन वीक, सीट इन फर्स्ट रो, समवन विल गेट टू यू.!
मला काही कळले नाही... गोंधळलेले अहो... मग कारकुनाने बोट दाखवले, "तिथे बस".. "कशासाठी? " हा विचार करत बसले.. त्यानंतर अजून एक केस घेतली जज्ज साहेबांनी, एक मुलगी ड्रग्स घेऊन ड्राइव्ह करताना पकडलेली. तीही अशीच २, ३ वेळा.. ती काहीतरी सॉलिड रिहॅब प्रोग्रॅम करत होती तिचा वकील कॉन्फिडन्ट होता तिला $५०० दंड सांगितलं काही फायनान्स च्या सुविधा सांगितल्या आणि जा सांगितले. परत उगाच बरे वाटले..

माझं काय चाललंय काही कळत नव्हत? काय करतेय मी? कुठे आणून सोडलंय? वर बघून आईलाच रागावून घेतले नेहमीप्रमाणे, पण सॉरी म्हटले तिला. वरून आई बोट करून, "आता तरी ड्रायव्हिंग सिरिअसली घेशील ना? " असे म्हणतेय असा भास झाला. कारकून थोड्यावेळाने एक पेपर घेऊन आला म्हणाला तुला ३ आठवड्यांनी यायचंय परत, फॉर नऊ यू आर ऑल सेट! काय??? झालं? इतका वेळ बसून जीव खाली वर करून घेतला ते हे ऐकायला, की परत या? फुस्स्स्स... इकडे तिकडे बघत मी निघाले कोणी अडवलं नाही सरळ गाडीत बसले आणि ऑफिस चा रास्ता धरला. सावकाश, आणि नीट स्पीड लिमिट बघत बघत.

ऑफिस मध्ये सांगितले होते की कोर्टात जाणार आहे बॉस गमतीनं म्हणाला चांगलं आहे पुढल्या तारखेला तुरुंगात गेलीस तर तिकडे येऊ भेटायला! बोला बोला सगळे बोला...😨 . पण आता अशी वेळ येणारच, सगळेच जण हात साफ करून घेणारच!
तर तो ऑनलाईन कोर्स पटकन संपवून टाकू विचार केला, म्हणून लॉग इन केले, च्यायला १२ मोड्यूल चा कोर्स??.. प्रत्येक मोड्यूल २० मिनिटाचे आणि त्यावर परीक्षा, मग फायनल एक्झाम, देवा!!!... पण मनाचा हिय्या करून एका दिवसात पूर्ण करून पास झाले. आता खरोखर सिरिअस होणे गरजेचे आहे, पूर्वीची डेव्हील बाहेर काढायला हवी अगदी २ चाकी सुद्धा चालवू इथे परत असाच विचार करत कंबर कसली.

खरे सांगायचे तर या कोर्समध्ये काही गोष्टी खरंच शिकले, बऱ्याच गोष्टी नवीन होत्या.. मला २० वर्षात हे माहीत नव्हते की चारही बाजूनं स्टॉप सिग्नल असला आणि सगळ्या गाड्या एकदम आल्या तर प्रत्येकाने आपल्या उजवीकडच्या माणसाला आधी जाऊ द्यायचे असते (right of the way). मी आपली फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह या धर्तीवर काम चालवायचे. सायकल चालवणारे आणि चालणारे याना फार काही रूल नसतात त्यांना सगळीकडे आधी जाऊ द्यायचे असते हे जरा तापदायक वाटले हमम!
अल्कोहोलचे चांगले परिणाम आणि फायदेही असतात हे या कोर्समध्ये शिकले ;) (अर्थात ड्रायविंगसाठी नाही, पण कोर्स फारच डिटेल होता.... ) चक्क 'ह्युमन अनाटॉमी' पण शिकले. फिजिक्सचे बरेच नियम यथासांग परत एकदा घोकवले नं, थोडे मेकॅनिकल इंजिनीअरिंग सुद्धा.. आणखी बरेच काय काय... असो.

आज जरा लेख लिहिल्यावर स्ट्रेस कमी झाल्याचा भास होतोय, काल अंजली आणि सुशांत भेटले. मी म्हटलं, मी आता माझी तिकीट गाथा लिहितेय ती वाचा. ते खूश झालेले दिसले... सगळेच मेले त्या ट्रॅफिक पोलीस सारखे नसतात ही काय ती सुखाची बाब!
तर मंडळी माझ्यासाठी पुढच्यातारखे पर्यंत तुम्हीही सदीच्छा द्याल ही आशा! 😃

धन्यवाद!

- **शीतल सोनार**

# मजला स्मरतील काय..

मी निघून गेल्यावर मजला स्मरतील काय?
पण कोण कितीसे दिवस करतील हाय !
15 दिवसांनी आई-वडील, बहीण-भाऊ,जोडीदार सगळे जवळचे जुंपतील आपल्या दैनंदिनी,
चांगल्या-वाईट आठवणी घेऊन मनी,
शांत रात्रीत अश्रू ढाळुनी,
करतील विचार की ती पोकळी येईल कशी भरुनी...
करतील आश्चर्य महिन्याभरानी,
की दिवस इतके सरले मजवाचूनी,
माझ्या पुस्तकांना,खोलीत बघतील परत परत फिरुनी,
अन सुस्कारा सोडत 'सत्य' बघतील पाणावलेल्या डोळ्यांनी...
अगदी नेहमीप्रमाणे आकाश जाईल भरून तारकांनी,
सूर्य ही उगवेल ठरल्या वेळी,
महिने -वर्षे जातील उलटुनी,
प्रत्येकाच्या आयुष्याच्या राम-रागाड्यात मागे पडतील त्या  आठवणी,
अन माझे अस्तित्व उरेल फक्त एक फोटो बनुनी...

**वेदांती पारगांवकर**




## JIVAN ME EK BAAR AANA JAIPUR………with your children

Most of us are familiar with Hindi song " jivan mein ek baar aana Singapore".
I did visit Singapore 4 years ago, nice city but still want to stick with my slogan
"JIVAN ME EK BAAR AANA JAIPUR".

Many times we visit different foreign countries, not realising how beautiful things in our own country attracting foreigners. Jaipur is one of them and I think we should take our kids to show off amazing things in our country.

During my recent trip to India, I visited Jaipur second time. This city, the artistry and the talent is god's gift to this world. **Jaipur** is the capital and largest city of the Rajasthan state in India. The city was built by Sawai Jai Singh II , planned according to Indian Vastu shastra by Vidyadhar Bhattacharya in 1727. Jaipur is called PINK city because most of the structures including monuments, palaces are painted in terracotta color. The city has ample number of monuments, palaces ( Haveli) with amazingly beautiful Rajasthani architecture… second to none!!!

No matter how short time you have, the must see attractions are, HAWA MAHAL, JAL MAHAL, CITY PALACE, JANTAR MANTAR AND AMER FORT. Among all these, the most wowed me was Jantar Mantar.




Jantar Mantar is astronomical observatory built by Sawai Jai Singh II in 1724-1730.
Jantar means instrument and mantar means calculate. So Jantar Mantar is calculating instrument. It tells you the time based on the shadow cast from the sunlight.

This place looks like a children's playground with slides and things to climb on. But then you take a close look and everything has calibration marks. This was a state of the art observatory in the 18th century capable of measuring the movement of the sun and stars to significant percussion. The huge sundial, the Samrat Yantra, is **capable of measuring time to an accuracy of two seconds,** a significant technical achievement at the time. So why this need for accuracy. The answer was to give astrologers better data on which to predict the future!

Sawai Jai Singh II was an engineer, mathematician, astronomer, astrologer etc. etc.
He constructed five Jantar Mantars in total, in New Delhi, Jaipur, Ujjain, Mathura and Varanasi; they were completed between 1724 and 1735. At present only Jaipur Jantar Mantar is operational. It is amazing to know even 300 years ago, Indians were so advanced in astronomy, mathematics. Maharaja like Jai Singh II was super talented and creative and holds a special place in Indian History and world history.
One thing I would like to mention that to understand the whole mechanism of Jantar Mantar you must have a very good Guide otherwise you will be lost.

The other monuments in Jaipur like Hawa Mahal, AMER fort, City Palace and Hawa Mahal are exquisite architectural wonders and feast to the eyes!!


Hawa Mahal or was built in 1799 by Maharaja Sawai Pratap Singh.
They used red and pink sandstone to match the other pink monuments. Its unique five-story exterior resembles honeycomb of a beehive with its 953 small windows called jharokhas, are decorated with intricate latticework.
The City Palace is in the central-northeast part of the Jaipur city, which is laid in a grid pattern with wide avenues. It is a unique complex of several palaces, pavilions, gardens and temples. The most prominent and most visited structures in the complex are the Chandra Mahal, Mubarak Mahal, Mukut Mahal, Maharani's Palace, Shri Govind Dev Temple and the City Palace Museum.











AMER FORT, Constructed of red sandstone and marble, the attractive, opulent palace is laid out on four levels, each with a courtyard. It consists of the Diwan-i-Aam, or "Hall of Public Audience", the Diwan-i-Khas, or "Hall of Private Audience", the Sheesh Mahal (mirror palace), or Jai Mandir, and the Sukh Niwas where a cool climate is artificially created by winds that blow over a water cascade within the palace. Hence, the Amer Fort is also popularly known as the Amer Palace.The palace was the residence of the
Rajput Maharajas and their families. Since the Fort is on the hills, unless you are
a hiker, you need a vehicle to reach there. Since gas pollution affects the marble, they have forbidden cars, you need to use battery car or electric car.







The Jal Mahal palace is an architectural showcase of the Rajput style of architecture (common in Rajasthan) on a grand scale. The building has a picturesque view of the lake itself. The palace, built in red sandstone, is a five storied building, of which four floors remain underwater when the lake is full and the top floor is exposed.




There are lot more beautiful places to see in Jaipur, if you have ample time.
Other than architectural marvels, Jaipur is also famous for blue pottery, block printing, bandhani, batik, lehria, Kundan style jewellery, mirror work on lac and many more.

Saying one more time " JIVAN ME EK BAAR AANA JAIPUR"!!!

- **Sushama Sukhtankar**


INDIE
ROUTES BAND
India's Award Winning Sufi-Fusion Band....
BOLLYWOOD • SUFI • FOLK • CLASSICAL • SPIRITUAL
shilp
NEW YORK LIFE
VRAJESH PATEL
AGENT
440-319-5848
SEBASTIAN GEORGE
MORTGAGE CONSULTANT
734-560-2728 (MOB)
734-261-0742 (WORK)
SAABY74@VEMAMORTGAGE.COM
OCT 05, 8 PM
FORD COMMUNITY & PERFORMING
ARTS CENTER
TICKETS & INFO
WWW.SHILPENTERTAINMENT.COM
248-923-1078
miindia.com
Michigan Indian Community

## पाऊसखुणा - पण ओल्या

आम्ही १९४२ साली आमच्या बंगल्यी रहावयास गेलो. पत्ता होता: गल्ली क्रमांक ६, पुरंदरे वसाहत, पुणे २ (म्हणजेच सध्याची सुभाषनगर कॉलनी). घराचे नाव होते 'विश्वास'. मी त्यावेळी दहा वर्षांचा होतो. बंगला रहावयास तर उत्तमच होता पण मला जास्त आवडला तो त्याच्या भोवतीचा परिसर, कारण त्यामुळे माझा बागकामाची हौस पुरवता आली असती.

बंगल्याच्या चारी बाजूस झाडे लावण्यास भरपूर जागा होता. मला जन्मत:च बागकामाची आवड. घरातीस सर्वांनाच माहित असलेले हे वेड. अंगणाच्या पुढच्या भागात नळाचे वेगळे कनेक्शन होते.पुण्यात त्या काळी स्वच्छ पाण्याचा पुरवठा २४ तास असे. पाणी कमी पडण्याचा प्रश्नच नव्हता. शिवाय परसदारी पाण्याचा एक हौद होता. शिवाय बागेवर प्रेम करणारा , रोज पाणी घालणारा एक 'पोरगा'ही होता - घरचाच.

वडलांना स्वत:ला बागकामाची आवड असल्याने त्यांनी बागेची आखणीपण सुरेख केली होती. प्रवेशद्वाराजवळ क्रोटन व सुरूचे बेताचे वाढणारे वृक्ष होते. शेजारीच विटांच्या बॉर्डरच्या आत मोगरा, गुलाब, जास्वंद, कण्हेर अशी झाडे लावली होती. पहाटेच्या वेळी मोगऱ्याचा दरवळ दूरवर पसरत असे. जाई-जुई यांच्या वेली बाहेरच्या खोलीबाहेरच्या कट्ट्यावरच्या दोन्ही बाजूस लावल्या होत्या. त्या वेलींच्या मांडवाखाली कट्ट्यावर बसणाऱ्यांना आपल्या संध्याकाळचे सार्थक झाल्यासारखे वाटले.



परसदारी वृक्ष लावण्यातही वडलांनी खूपच कल्पकता वापरली. एका कोपऱ्यात शेवग्याचे झाड होते. त्याच्या शेंगांची चव अजूनही जिभेवर आहे. त्याच्याजवळ कढीलिंबाचे झाड होते. त्याचा वापर आम्ही आणि आमचे शेजारी भरपूर करत असू. त्यातल्या क्वचित् येणाऱ्या शेजारणींपैकी दोघी आमच्या कढीलिंबाची तासंपट्टी करून जात. जणू काही झाडाचा एक पण 'पत्ता' शिल्लक ठेवायचा नाही, हीच प्रतिज्ञा करूनच त्या येत असाव्यात!

परसदारी असलेल्या अजून काही झाडांचा उल्लेख केलाच पाहिजे! एक तगरीचे झाड होते. त्याची पांढरीशुभ्र फुले डोळ्यांस आल्हाददायक वाटत. पाण्याच्या हौदाजवळ केळी, तर मधल्या जागेत गवार, वालपापडी, भेंडी, भोपळा ही झाडे भरपूर पीक देत. कोपऱ्यांतील तिसऱ्या मजल्यापर्यंत वाढलेली मधुमालतीची वेल नेहमीच फुलांच्या घोसाने डंवरलेली असे.

पुण्यातील उत्तम हवेमुळे गव्हर्नरसाहेब वर्षातून चार महिने पुण्यात असत. शेतजमीन असल्यामुळे पुण्यात त्या काळात डासांचा उपद्रव खूप असे. कोयनेलच्या कडू गोळ्या खाव्या लागत, ती एक शिक्षाच वाटे. प्लेगचाही उपद्रव असल्यामुळे लस टोचून घ्यावी लागे. या गोष्टी उणे होत्याच तरीपण आजचे पुणे हे पूर्वीचे राहिले नाही हे खरेच. माझ्या मनातील सुंदर पुण्याच्या पाऊलखुणा पूर्णपणे पुसत्या गेल्या आहेत. मग उरल्या आहेत कसल्या खुणा?

बागकाम झाल्यावर मी हौदावर हातपाय धुवून येत असे. पाय पुसायला मात्र नेहमीच विसरायचो. त्यामुळे घरातील फरशीवर माझ्या पावलांचे ठसे उमटत असत. त्यामुळे माझी ताई कुचेष्टेने म्हणायची, "त्या ओल्या पाऊलखुणा पूस आधी, तरच मी म्हणेन तुझं बागकाम पूर्ण झालं ...."

- **शरद घाटपांडे**

# ती आणि तो

ती आणि तो सायकल वर चालले होते. डबल सीट.. ती मागे बसली होती. तिने त्याचा शर्ट हलकाच धरला होता. पण त्यात पण तिला कितीतरी भक्कम आधार वाटत होता. असाच  तर काही वर्षांपूर्वी त्याने तिला लग्नाची मागणी घातल्यावर हळुवार पणे पण भक्कमपणे जगाचा विचार न करता तिने होकार दिला होता.

खरं तर तिने त्याला दर वर्षी नाही, पण अनेकदा राखी बांधली होती. एकत्र भलं मोठं कुटुंब होतं आणि तो दूरचा कोणीतरी चुलत चुलत आत्येभाऊ होता. दिसायला हँडसम, सगळ्यांशी खेळीमेळीने वागणारा आणि शिवाय इंजिनिअरिंग कॉलेजला शिकणारा. कधी चुकून राखीपोर्णिमेला घरी आलाच तर घरातली वडीलधारी माणसं सगळ्या तरुण मुलींना त्याला राखी बांधायला रांगेत उभी करायची. त्यातलीच ही एक. तिला तो खूप आवडायचा पण अशक्य गोष्टी मनात कशाला आणायच्या असा विचार करून ती पण भाऊ मानुन राखी बांधायची.

सावळी, तरतरीत. सगळ्याच बाबतीत हुषार अशी ती; त्याला फार आवडायची. तिची बारावी झाली आणि एकदा त्याने तिला बाहेर गाठलंच. सांगून टाकलं सरळ "मला तू खूप आवडतेस आणि मी लग्न करेन तर फक्त तुझ्याशी करेन. मी माझ्या आई-वडिलांना पण सांगून टाकलंय. आता तू ठरव". काहीच क्षण तिने विचार केला. राखी बांधलेल्या मुलाशी लग्न? पण आपल्याला अगदी मनापासून आवडणारा हाच तो. मग काय फिकीर करायची कोणाची! आणि तिने हळुवार लाजत पण सगळ्या आप्त परिस्थितीला तोंड द्यायला भक्कम होऊन त्याला होकार दिला.

लग्नाला दोन वर्षे झाली होती. त्याने सिव्हिल इंजिनीरिंग संपवून एका लहानश्या गावात नोकरी घेतली होती. त्या गावात धरण बांधण्याचा प्रोजेक्ट होता. हा मॅनेजर होता. लहानसा बंगला पण मोठं अंगण, असं सरकारी घर त्याला मिळालं होतं . दोनशे-तीनशे लोकांचं ते नदीकाठचं गाव. वीज बऱ्याचदा नसायचीच. तिने  अंगणात भरपूर पालेभाज्या लावल्या. शिवणकाम-भरतकाम सुरु ठेवलं. तो पण आपल्या कामात गुंतला. दोघांना हिंदी सिनेमाचा शौक. नदी पलीकडच्या गावात कोणताही नवीन सिनेमा आला की हे दोघे सिनेमाला जाणारच. त्यासाठी आधी सायकल वरून त्यांना नदीपर्यंत जावं लागायचं. तिथून एका नावेत बसून पलिकडच्या गावात.



आज पण ते असेच देव आनंदचा "गाइड" सिनेमा बघायला निघाले होते. नेहमीप्रमाणे, सायकलने नदीकिनारी पोहोचले. नावाडी उभा होताच. ते नावेत बसणार तेवढ्यात ऑफिसचा शिपाई निरोप घेऊन आला की मोठ्या साहेबांना काही काम आहे म्हणून ते अर्ध्या तासात तुम्हाला फोन करणार आहेत. तो तिला म्हणाला "तू हो पुढे. आज त्या गावातल्या आजी येणार आहेत ना आपल्या बरोबर सिनेमाला, त्यांना घेऊन तू बस, मी येतोच." त्याने म्हटल्यावर तिचा हो-नाही म्हणायचा प्रश्नच येत नव्हता. तिने त्याच्याकडे बघून एवढंच म्हटलं "लवकर या, वाट बघते." आणि ती निघाली. आजीला घेऊन सिनेमाला गेली. लक्ष लागत नव्हतं सिनेमात. पूर्ण सिनेमा संपला, पण तो आलाच नाही. टॉकीजमधनं दोघी बाहेर पडल्या तर बाहेर कडाक्याचा पाऊस. आजीला तिने त्यांच्या घरी सोडलं . छत्री तर कायमच बरोबर ठेवण्याची सवय. तेवढ्यात एक नावाडी निरोप घेऊन आला" साहेबांनी सांगितलंय की ते दहा मिनटासाठी धरणाचा दरवाजा बंद करतील. निघायला हवं." ती ताबडतोब त्या नावाड्याबरोबर निघाली. नदीकिनारी आली तेव्हा नदीला चांगलाच पूर आला होता. पण त्याने तिला निघायला सांगितलं होतं. ती कसलाही विचार न करता नावेत बसली. नाव वेडेवाकडे उंच हेलकावे घेत होती पण हिच्या चेहेऱ्यावर भितीचं नामोनिशाण नव्हतं. शेवटी कशीबशी नाव काठावर आली. तो तिथे छत्री घेऊन तिची वाट बघत उभा होताच. त्याने तिला नावेतून उतरायला हात पुढे केला. तिने पटकन हात घट्ट धरला.

दोघे एका छत्रीत चालत होते. तिने हात सोडला नव्हता आणि त्याने सोडवून घ्यायचा प्रयत्न पण केला नाही.

तो (तिच्याकडे बघत ) : थोडं थांबुन निघायचंस ना. नाही तर आजीकडे राहून जायचं आजच्या दिवस .

ती : (त्याच्या डोळ्यात बघत): तू म्हणालास की निघ, तर मला पूर्ण खात्री होती की काही वाईट होणार नाही.

तो: अगं पण नदीचं पाणी ......

ती: ज्या दिवशी तू मला लग्नासाठी विचारलं होतंस आणि मी तुला होकार दिला होता, त्या क्षणापासून मी स्वतःला समर्पित केलंय तुझ्या हाती.

ते सायकल जवळ पोहोचले होते. तिने परत त्याचा शर्ट हलकाच धरला ... भक्कम विश्वासाने .

- **पल्लवी सप्रे**

---



# CENTRAL HOME HEALTH CARE, INC.

Quality Home Health Care Since, January 1985
JCAHO Accreditation Since 1991

Do You Have……..

1. Joint, Neck, or Back Pain or Joint Stiffness?
2. Poor Circulation or have a Wound that is not healing?
3. Diabetes, Heart, and/or Respiratory Problems?
4. A Cardiac diagnosis that affects your quality of life?
5. A previous Stroke, Accident or Fracture(s)?
6. Difficulty with walking or a history of falls?
7. Or will have a Hip/Knee/Shoulder Replacement?
8. Problems with frequent Hospitalizations?



If so, then you may be eligible for home care services from Central Home Health Care.

WHO PAYS?

Your Insurance will pay **IN FULL** if you have Medicare, Medicaid, BCBS, Auto, or Private Insurance.

WHAT YOU NEED TO DO?

Call our number below or ask your physician/social worker to call us to make a referral.

WHAT DO WE OFFER?

Nursing, Physical Therapy, Occupational Therapy, Speech Therapy, Medical Social Work, Home Health Aide Services, Registered Dietician Services.

WE COVER THE METRO-DETROIT (TRI-COUNTY) AREA

**Ph: (800) 698-5410 – Fax (248) 569-5412**

**Owned and Operated by the Walvekar Family**

20245 W. 12 Mile Road, Ste. 100, Southfield, MI 48076.

www.centralhomecare.com

## भारत दौरा - टप्पा क्र. २

साधारणतः दोन-चार आठवड्यानंतर सगळी हौस-मौज करून पुन्हा आपलं घर गाठायचे वेध लागलेले. परतीच्या प्रवासाचा क्षीण-थकवा. एकदा घरांत शिरल्यावर, संमिश्र भावनांनी एकवार सगळीकडे नजर टाकल्यावर असं जाणवतं की नेहेमीप्रमाणे घरातील काही वस्तू आपआपल्या जागी तटस्थ, एका वेगळ्याच केविलवाण्या मुद्रेने, बापड्यासारख्या उभ्या आहेत... काहींनी अगदी हमखासपणे स्थलांतर करून, आपली सरहद्द पार ओलांडून परप्रांतात जाऊन अगदी हक्काने ठिय्या मंडला आहे .. आपल्या अस्तित्वाची विशेष जाणीव करून दिलेली (म्हणजे पसारा ..... हे नव्याने सांगायची गरज आहे का?... ). या सगळ्यांची हजेरी घेत घेत, माझा मोर्चा हळूहळू, दबकत दबकत फुलझाडांकडे वळतो. आणि माझ्या डोळ्यांत एक विलक्षण अपराधी भाव उफाळून येतो ......!

पार सुकून राकट झालेली तुळशीची रोपं, बाकीची थोडीफार शोभेची झाडं जेमतेम तग धरून, आला दिवस पुढे रेटत असलेली ... बाहेरचा बर्फ, काही थांबण्याचे काही नाव घेत नाही, त्यामुळे आधीच गारठलेली, जवळजवळ माना टाकलेली, माझी अगदी हाताच्या बोटावर मोजता येणारी पण अत्यंत लाडकी फुलझाडं... "अल्ला को प्यारी" झालेल्या अवस्थेत..... एकूण काय तर आपल्या गैरहजेरीत लागलेली, या चालत्या बोलत्या हिरव्यागार झाडांची वाताहात! भारत दौरा संपवून २/४ आठवड्यांनी घरी परातल्यावरचा हा मानसिक पीडादायी अगदी ठरलेला, नित्यक्रम......... भारत दौरा - टप्पा क्र. २!



सप्टेंबर च्या सुमारास झालेल्या अकाली थंडी आणि डिफ्रॉस्ट मुळे बाहेर पॅटीओ वरचा कडीपत्ता पार गारठून गेला. आणि बघतां बघतां पटकन त्याच्या फांद्या, पानं पार सुकून-गळून गेली. कामाच्या गडबडीत, यंदा प्रवासाला निघण्यापूर्वी जवळच्या मैत्रिणीकडे माझी झाडं द्यायला विसरले होते. माझ्या हलगर्जीपणामुळे ते झाड मेलं, याचा मनस्वी राग आला, खूप चीडचीड झाली. मला अत्यंत वाईट वाटलं .. पण हे झाड खरंच मेलं असेल का? हे स्वीकारायला काही केल्या, मन धजतच नव्हतं ...आणि ते झाड आता टाकून द्यावं, हे ही करायची हिंमत, त्याहीपेक्षा मन:स्थिती नव्हती....

अगदी खूप जरी नसली माझी तरी मोजकीच ४/५ झाडं - त्यात हलकेच दरवळणारा मोगरा, बाप्पा मोरयाच्या नैवेद्यासाठी नेहेमीच मोठ्या उत्साहाने दिमाखात सज्ज असलेली केळी, हवा शुद्ध करणारी कोरफड (Aloe Vera), सगळ्यांच्याच आरोग्य-स्वाथ्यासाठी नेहेमीच सतर्क-जागरुक असणारी औषधी तुळस, Peace लीली आणि झालंच तर इकडून-तिकडून झुळझुळणारी एक/दोन मनी प्लांट्स ..हा एवढाच माझ्या झाडांचा गोतावळा, पण त्यांच्याशी मनमुराद गप्पा मारायला, हितगुज करायला अगदी पुरेसा... ! असं म्हणतात की झाडांशी बोललेलं त्यांना उमगतं. आपला स्पर्श, आवाज, भावना, ध्वनीलहरी त्यांच्यापर्यंत पोहोचतात आणि त्याला योग्य तो प्रतिसाद सुद्धा देतात. अर्थात पुरेश्या सूर्यप्रकाश आणि खत-पाण्याबरोबर ही मंडळी प्रेमाची देखील भुकेली असतात. असो.



बऱ्याच मस्का-पॉलीश नंतर, आमचा जवळचा मित्र संदीप मोरे याने "मारणार नसलीस तरच देईन" या बोलीवर चांगलं धष्टपुष्ट करून देऊ केलेलं हे कडीपत्त्याचं हे झाड... हा हा म्हणतां, बाहेरच्या गारठ्याने इतक्या पटकन मरून जाईल यावर विश्वासच बसत नव्हता. गेल्या दिवाळीला कच्च्या पोह्याच्या चिवड्याची लज्जत, या घरच्या कडीपत्त्याने वाढविली होती... ही नक्कीच एक आत्मसमाधानाची बाब होती. मला पाहिजे म्हटल्यावर माझी मैत्रीण नीलम कुळकर्णी ने तिच्याकडचा अगदी सहज उचलून दिलेला "मोगरा" .. या झाडांबरोबरच, त्यामागच्या मैत्रीच्या भावना जपणं, हेही तितकंच महत्वाचं ... दरवर्षी मोगरा बहरला की पहिला फ़ोन आणि फोटो न चुकता नीलम आणि आनंदला पोहोचतात ....असो!

पण यावेळी मला मात्र भारतातून परतल्यावर एक विलक्षण सुखद धक्का बसला ....

त्या कडीपत्त्याला चक्क नवीन हिरवीगार, लुसलुशीत पालवी फुटली होती. आणि दोन-तीन छोटी छोटी रोपं मोठ्या दिमाखात माझ्या स्वागताला हसत खेळत तयार होती....... कदाचित मला झालेल्या पश्चातापामुळें, ह्या माझ्या छोट्या दोस्तांनी, माझ्या निष्काळजीपणावर पांघरूण घालून यावेळी दोस्तीमें "माफ" केलं असेल कदाचित .....आणि एका नव्या उमेदीसह, कुठेतरी नकळत आनंदाने जोरांत शब्द उमटले .... Spring is in the air..... Spring is in the air !!!

- **सौ. सरोज प्रशांत जावकर**

## ईठ्ठल-रखुमाई

जिथे जाऊ तिथे लागे, ध्यान पांडुरंगी
क्षणोक्षणी/नेहमीच मन माझे, ईठ्ठल, ईठ्ठल करी ।।

भाविकांच्या ठायी-ठायी, ईठ्ठल रखुमाई
हरी, हरी भजनात, मन रमूनी रे जाई ।।

ईठ्ठलाच्या दर्शनान, होई आनंदी-आनंद
देव मला पावु दे रे, पांडुरंग श्री हरी ।।2।।

ईठ्ठल रखुमाई, पांडुरंग श्री हरी

**निरंजन हुंबड**

Youtube video:
https://www.youtube.com/watch?v=h5pzZmzdzRY



## आम्ही नातवंडांकडून काय शिकलो ?

'मोठे तेवढे खोटे व लहान ते महान' ही उक्ती ऐकली होती पण आजी झाल्यावर चिमुरड्या ( ! ) नातवंडांशी खेळताना अगदी ती तंतोतंत खरी असल्याचे जाणवले व आपण उगाच मोठे झालो याची खंत वाटली. बालमन अगदी निरागस व चंचल असते . पण आपण त्यांना जितके समजतो तितके ते नासमज मुळीच नसतात, याचा प्रत्यय आला. आत्ताच्या कॉम्पुटर युगात तर ही पिढी फास्ट फॉरवर्ड झाली आहे, म्हणायला हरकत नाही.

त्यांच्या डोक्यात अनेक प्रकारच्या कल्पना व विचार असतात. त्या केव्हा, कुठे व कशा रीतीने बाहेर पडतील हे सांगणे कठीण. एखादा नवीन शब्द ऐकला तर त्याचा योग्य ठिकाणी वापर करणे व आपण केलेल्या प्रयोगाचे कोणीतरी कौतुक करावे ही बालमनाची ईच्छा (की आग्रह!) असते. असाच एकदा निषादच्या तोंडी 'गरज' शब्द ऐकल्यावर मी चाटच पडले . त्याला मी म्हटलं “चल मी तुला भात भरवते”. त्यावर तो म्हणला “नाही, त्याची गरज नाहीये'.' मला पण वाटले की असले भारी शब्दप्रयोग करणाऱ्या मुलाला आता भात भरवण्याची खरंच गरज नाही!



आपल्या मनासारखे न झाल्यास रुसवे - फुगवे हे तर लहानपणीचे मोठे शस्त्र आहे. आई-बाबा रागावले तर हक्काच्या आजी-आजोबांकडे जायचे, गाऱ्हाणे सांगायचे व आपली बाजू पटवून देणे हा तर जणू त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे. थोडक्यात स्व-रक्षणाचे धडे त्यांना द्यायलाच लागत नाही. मोठ्यांचे अनुकरण करणे व त्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्वतः तसेच वागणे हा त्यांचा आवडता खेळ. असा खेळ खेळत असतांना आम्हा आजी-आजोबांना बरेच वेळा निषाद व सारंग (म्हणजे लहान) होण्याचे सौभाग्य लाभले .

दोन शब्दांना जोडून नवीन शब्द तयार करणे किंवा जोडशब्दाला तोडून त्यातील अर्थ समजणे हा केवळ आपण शिकलेल्या व्याकरणाचा भाग नसून तो 'शब्दखेळ' आहे असे ह्या मुलांना पाहून वाटते. माझे नाव प्रतिभा. म्हणून मी प्रतिभाआजी. असे सांगितल्यावर निषादने लगेच ' प्रति-भाजी ' शब्द तयार केला व माझ्या नावात भाजी कशी आली ते त्याने विचारले. ह्यावर मी काय उत्तर देणार?

असेच एकदा मी व उल्का बोलत असतांना निषाद तिला मधे मधे प्रश्न विचारत होता तेव्हां उल्काने त्याला सांगितले "कोणी एकमेकांशी बोलत असताना मधेच असे बोलू नाही ". त्यावर त्याने तोडगा काढला, "तू एकाशी बोल, मी मेकाशी बोलतो." अशा रीतीने त्याने 'एकमेकांना' सुट्टे करून नवा शब्द तयार केला. ते ऐकून आम्हाला हसू आले व त्याचे कौतुक वाटले. त्याचा हा शब्दप्रयोग चुकीचा नव्हता व एवढे दिवस आपल्याला हे का सुचले नाही असे वाटले!

एकदा निषाद काहीतरी खात होता. त्याच्याकडे आजोबांनी खाऊ मागितला. तो म्हणला "काही नाही देणार" . गम्मत म्हणून आजोबांनी त्याला सांगितले "तू म्हणला ना, काही-नाही, देणार मग मला ‘काही नाही’ दे”. त्यावर त्याचे प्रत्युत्तर होते , "आजोबा मी काही, नाही देणार”. काही शब्दानंतरचा अल्पविराम व नाही शब्दाला underline त्याने बरोबर दाखवले. मला सांगा ह्या मुलांना grammer कोणी शिकवले का? सबकुछ observation , application and practical .

'सारेगम' चे धडे येता-जाता घरात आमच्याशी चालायचे तेंव्हा एकदा त्याने आम्हाला exhaust fan मधून ' सा ' कसा वाजतोय ते गाऊन दाखवले.

एकदा आमची सर्वांची स्वारी zoo कडे निघाली. तिथे एका तळ्यात बदकं होती. त्यांचा quack quack आवाज चालू होता. खूप वेळ झाल्यावर मी निषादला म्हणले , " चला आता duck ला bye bye करा." त्यावर त्याने मला समजावून सांगितले, "आजी, duck ला आपली भाषा नाही कळत.” त्याने duck ला bye bye च्या tone मध्ये quack quack केले!



लहान मुलांना आपण mannners म्हणून सांगतो की कोणाच्या घरी गेल्यावर काही मागायचे नाही तर त्यांना त्यावर पडलेला प्रश्न असतो, "मग त्यांना समजणार कसे की आपल्याला काय हवे आहे ते?" हे बाल - लॉजिक खरेच आहे ना?

एकदा मी चहा करत असताना निषाद माझ्याजवळ आला व त्याच्याबरोबर मी drawing, painting करण्याचा आग्रह करू लागला. मी त्याला म्हणले, "आत्ता मी चहा करते. मग थोड्या वेळानी येते." पण त्याला धीर नव्हता. त्याने ताबडतोब आजोबांना उठवले व जणू ऑर्डर सोडला,

"आजोबा, तुम्ही चहा करा म्हणजे आजी माझ्याबरोबर drawing करायला येईल." मला सांगा management याहून काही वेगळं असता का ? problems कसे solve करायचे ते तुम्हाला आलं पाहिजे .

निषादला खीर खूप आवडते म्हणून मी त्याला आग्रहाने खीर देत होते . त्याचे पोट भरले असल्यामुळे त्याला खीर नको होती. तर त्याने काय सांगावे ? "मी काही khirman आहे का?" हे सर्व spiderman , superman वगैरे बघण्याचे प्रताप.

रस्त्यावरून वेगाने धावणाऱ्या गाड्यांची नांवे तर त्याच्या तोंडी इतक्या वेगाने येतात की आपले observation व memory फिकी पडते असं वाटायला लागतं. निषाद ४-५ वर्षाचा असतानाच्या ह्या सर्व गोष्टी, आम्हाला अनुभवायला मिळाल्या .



निषाद पेक्षा सारंग ४ वर्षाने मोठा असल्याने त्याचे खेळ, त्याच्या आवडी-निवडी, त्याचे वागणे थोडे वेगळे. त्याचा स्वभाव पण थोडा निराळा. त्याच्या स्वभावात निषादसारखी अखंड बडबड नसली तरी सतत काही ना काही वाचत राहण्याची त्याची आवड, त्याला स्वस्थ बसू द्यायची नाही. cereal खाताना, गाडीतून येता-जाताना व रिकाम्या वेळात सतत वाचन हा त्याचा आवडता छंद. रात्री पण झोपायच्या आधी त्याच्या हातात अचूक पुस्तक सापडते. हॅरी पॉटरच्या तर त्याने किती आवृत्त्यांचे पुनरावर्तन केले असेल कुणास ठाऊक. त्याच्या ह्या प्रचंड वाचन-वेडा मुळे आम्हाला त्याच्या मेंदूतील knowledge book मधून अमेरिकेचा ढोबळ भूगोल, total states, त्याची capitals व त्याची माहिती, इथल्या पदार्थांची नांवे, बाजारातून आणलेल्या सामानाच्या instructions वगैरे कळायला, त्याची बरीच मदत होते.

एकदा camping ला गेलो असताना तर त्याने बेडूक हातात घेऊन, snail शी खेळ करून, त्याचे प्राणी-प्रेम सिद्ध केले. शाळेतून आणलेल्या seeds चे plantation करणे, त्याची मशागत करणे, हा त्याचा आणखी एक छंद. जे हात, ही सगळी कामं करण्यात व्यस्त असतात, तेच हात violin वर असे फिरतात की ऐकताना असे वाटते की या वयात हे सर्व कसे काय जमते? याशिवाय soccer, basketball, swimming या सर्व गोष्टी पण अधून-मधून चालू असतात. त्याच्या अशा अनेक सवयींमुळे आम्हाला chittah, leopard व jaguar हे तिन्ही वेगवेगळ्या प्राणी असल्याचे प्राणी असल्याचे कळले. त्याच प्रमाणे parsley, cylantro सारख्या garnishing वस्तूंची नावं लक्षात आली. भारतात आपल्याला फक्त कोथिंबीर (coriander) माहित आहे. आपले curd इथे yogurt असते, ते ध्यानात आले. इथे काही छोटी खरेदी करताना सारंग बरोबर असेल तर आम्हाला हायसे वाटते व शॉपिंग करण्याचे आम्ही धाडस करतो.

थोडक्यात काय तर, ह्या पिढीपासून बरेच काही शिकण्यासारखे आहे. मात्र हे सर्व करताना त्यांच्या कलेने आपल्याला वागायला लागते. कारण वयाच्या मानाने बुद्धीची वाढ व ज्ञानाची व्याप्ती मोठी असली तरी वयाच्या अनुषंगाने परिपक्वता तेवढी नसल्याने त्यांना समजून घ्यावे लागते. आपली पुढची पिढी अतिशय स्मार्ट आहे यात काही शंका नाही. त्यामुळे त्यांच्याकडून आपण खूप काही शिकू शकतो.

ह्या गोष्टी तर ३-४ वर्षांपूर्वीच्या आहेत. त्यामुळे तेवढे लहान असताना, त्यांच्याकडून अशा गोष्टी आम्ही जाणल्या. अजून ही पिढी तर रॉकेट गतीने उंच जात आहे तर त्या प्रमाणात अजून खूप काही आम्हाला शिकायला, जाणायला मिळणार यात काही शंका नाही.

- **सौ. वसुधा टाकळकर**

# माझा आनंदाचा ठेवा

आजी आजोबांचा पुण्यातला नित्यक्रम चालू असतो आणि एक दिवशी फोन वाजतो. फोन घेताच नातवाचे फास्ट बोलणे चालू होते. “आजी, now snow has melted and spring is here. But you are still not with me”! अशी गोड तक्रार आल्यावर मनाची चलबिचल होते. पटापट कॅलेंडर काढून तारखा बघून कोणती कामे मागे टाकता येतील आणि कोणती कामे केली नाहीत तर चालतील अश्या categories करून एकदाचे flight बुकिंग होते. नंतर मग दोन दिवसाआड फोन चालू होतात. "मला समर हॉलीडेस आहेत, मामाला का नाहीत, त्याला पण आण"! अशी मागणी होते. मग ‘can you make’ आणि ‘can you bring’ अशी छोटी wish list तयार होते. मी उत्साहाने कामाला लागते. एकदाचा तो मोठ्ठा प्रवास संपवून आम्ही येथे पोचतो. भेट झाल्यावर खात्री करून घेतली जाते, इथून कुठेही तुम्ही जाणार नाही ना? इथले routine चालू होते, सकाळी शाळेसाठी आवरणे, ती कसरत आई बाबा पार पाडतात. पिलू शाळेत जाते. आल्यावर दूध पिणे झाले की गप्पा चालू! आमच्या लहानपणी TV नव्हता. Toys share करायचे हे ऐकून त्याला आश्चर्य वाटते. झोपताना मागच्या summer मधील stories जुन्या होतात, नव्या सांगाव्या लागतात. त्यात आमच्या pet dog ची आणि माझ्या शाळेतील एका खट्याळ मुलाची गोष्ट मात्र ऐकायची असते.



ज्या दिवशी स्कूल नसेल त्या दिवशी केव्हातरी आजीची अचानक परीक्षा घेतली जाते. "What do you know about space, earth, dinosaurs, aviators, superman, batman?" आणि Bey-blades च्या परीक्षेत आजी नापास होते. मग हे छोटे गुरुजी सांगतात - “You should learn new things आज्जी!”
मध्यंतरी India visit ला आल्यावर त्याला वाटले 'helper ladies' असून आजीचे काम संपत का नाही? दिवसभराची गडबड बघून म्हणाला, “आजी, there is no one to help you, I will tell बाबा to make a robot for you!” मला इतका आनंद झाला की कुणीतरी आहे, जगात मला विचारणारे!

सप्टेंबर येतो तो बर्थडे मंथ असतो. Cake कोणता हे ठरते, पार्टी होते, खूप मजा येते. आता उगवतो शाळेचा पहिला दिवस, आजी आजोबा चांगले कपडे घालून जातात, शाळा बघतात. एक एक दिवस नवा आनंद देऊन जातो पण कॅलेंडर खुणावत असतं की परतीसाठी २ आठवडे राहिलेत. जाण्याचा दिवस येऊ नये असे वाटत असते पण येतोच. "आजी.. you stay here forever” अशी मागणी होते. कशी तरी समजुत काढून निघतो. पण कोमेजलेला चेहरा आणि दोन टपोऱ्या डोळ्यातील पाणी बघत निरोप घेताना, “हा माझा आनंदाचा ठेवा परत कधी भेटेल..?” याची वाट बघणे एवढंच माझ्या हाती असतं!

- **मृणालिनी कर्वे**

## माझे जीवनच आहे रास्त



कधीतरी वाटते खूप खूप उदास
का करावा हा निरर्थक, खडतर प्रवास?
तेव्हाच हे सांगावे ठासून मनास
की कोणाचेतरी आयुष्य आहे तुझ्याहुनही भकास!
जसे..
कोणी एकुलता एक जवान लेक होतो शहीद सीमेवर
म्हाताऱ्या बापाच्या खांदी त्याचे अचेतन कलेवर
कुठेतरी एक असाह्य, अगतिक माता
पाहूच शकत नाही तिचा नुकताच जन्मलेला बेटा
कोणी एक बेकार - लाचार पिता, मरतो अगणित वेळा
जेव्हा पाहतो तो आपल्या उपाशी मुलाचा रिकामा थाळा
कोण्या एका आश्रमातील चिमुकली कन्या
निमूटपणे सोसते आपल्या आयुष्याची दैना
कोणी रोगराईने ग्रस्त, कोणी गरिबीने त्रस्त
कुठे अत्याचार, शोषणाने जीवन असते भयग्रस्त
म्हणून
जेव्हा सुख असेल दूर आणि हास्य दुरापास्त
तेव्हा सांगा स्वत:लाच की माझे जीवन आहे इतरांपेक्षा रास्त
कारण
आयुष्य आहे सुंदर आणि सुख-दुःख क्षणभंगुर
पदोपदी बदलतो याचा सूर आणि नूर, पदोपदी बदलतो याचा सूर आणि नूर




- **सुमित्रा आष्टीकर**

Based on the following English Poem Circulated on WhatsApp, Poet Unknown. ‘Not as Happy as You!’

*Sometimes in Life we feel so Blue*
*But someone somewhere is not as happy as you*
*Somewhere far at the border, when a soldier sleeps*
*Missing his loved ones, he silently weeps*
*Somewhere a mother painfully sighs coz*
*Her new born baby did not open her eyes*
*Somewhere a poor dad silently cries*
*When he sees his son begging for a bowl of rice*
*Somewhere in an orphanage a little girl is sad*
*When she misses her mom and dad*
*So at times a reason to smile you may not have any*
*Say to yourself that you are happier than many*




Authentic Indian Groceries, frozen foods, pickles.

**Proudly serving the Indian community from 2 locations – Canton and Northville**

Canton store:44266 Cherry Hill Rd Canton, MI 48187
Phone: 734-844-6702







Northville store - 16991 Ridge Rd,
Northville, MI 48168.
Phone - 248-773-7345



REMERICA®
INTEGRITY II REALTY

SureshHomes.com
(734) 394-9981
svalsangkar@hotmail.com



**THINKING OF BUYING OR SELLING?**

Call me today - for FREE market analysis and move with Suresh

- Over 23 years experience
- Multi Million Dollar Producing Realtor®
- Full time Realtor
- Five Star Zillow Agent

SFR SHORT SALES & FORECLOSURE RESOURCE | EQUAL HOUSING OPPORTUNITY | REALTOR® | MLS

41000 SEVEN MILE RD. I SUITE 105 I NORTHVILLE, MI 48167



For more information call
**SURESH VALSANGKAR**
Multi Million Dollar Producing REALTOR® / Notary Public



**"Thinking of purchasing a home??**

No matter if you are buying your first home, moving across town or refinancing, Capital Mortgage Funding is here to help. We offer mortgage choices that can help make home ownership more affordable with the speed and service you deserve.



- Fixed- and adjustable rate mortgages (ARMs)
- FHA, VA, Jumbo and Conventional loans
- Loans for first time homebuyers
- As low as 3% down
- Refinancing options



CAPITAL MORTGAGE FUNDING
The Best Mortgage Banker
powered by FAIRWAY® INDEPENDENT MORTGAGE CORPORATION

Call me today!
Ron Jacobs
Senior Mortgage Banker, NMLS# 112741
Phone: (248) 821-7020
Email: RJacobs@lowrateonline.com
www.lowrateonline.com

*USDA Guaranteed Rural Housing loans subject to program stipulations and applicable state income limits. This information is not intended to be an indication of a loan qualification, loan approval, or a commitment to lend. Other limitations may apply. Capital Mortgage Funding is Powered by Fairway Indpendent Mortgage Corporation. NMLS#2289. EQUAL HOUSING LENDER.

# सोवळ्यातले सनदी अधिकारी

श्रावणातले दिवस होते. सगळीकडेच मंगलमय वातावरणात भाविकांची मोठी झुंबड उडाली होती. तीर्थक्षेत्रे, देवळे श्रद्धाळुंनी नुसती फुलून गेली होती. पावसाला वेळेवर सुरवात झाल्यामुळे एव्हाना धरित्री हिरवागार शालू पांघरून नव्या नवरीसारखी नटली होती. उपास-तापास, पूजा-अर्चा यांना नुसते उधाण आले होते. वर्षातल्या सगळ्या महिन्यांचा राजा हे सार्थ बिरुद श्रावण महिना सार्थ करीत होता.

शुक्रवारचा दिवस म्हणजे आठवड्यातला कामाचा शेवटचा दिवस. पुढील दोन दिवसाच्या सुट्यांचे नियोजन ऑफिसमधून घरी जाण्यापूर्वीच मी करायला सुरवात केली होती. घरी जाऊन मस्तपैकी चहा-भज्यांचा आस्वाद घेत घेत घरवालीला शनिवार रविवारचा भटकंती आणि देव देव करण्याचा बेत सांगायचा आणि रात्री तयारी करून शनिवारी सकाळीच प्रस्थान ठेवायचे या विचाराने मन सुखावले होते.

इतक्यात साहेबांनी बोलावल्याचा निरोप आला, आत गेलो. बसण्याअगोदरच साहेबांनी आमच्या मुख्य कार्यालयातून आलेला टेलेक्स माझ्या हातात दिला. खुर्चीवर बसता बसता मी टेलेक्स डोळ्याखालून घातला. प्रथमदर्शनी माझा त्या टेलेक्सशी काही संबंध नसावा असे मला वाटले, परंतु पूर्ण टेलेक्स वाचून झाल्या झाल्या साहेबांनी फर्मान सोडले, "तुम्हाला रविवारी दिल्लीहून येणाऱ्या सिनियर आय. ए. एस. अधिकाऱ्यांबरोबर घृष्णेश्वरला जायचे आहे." माझ्या अगोदर काहीच लक्षात आले नाही. माझा, दिल्लीतल्या आय. ए. एस. अधिकाऱ्याचा आणि घृष्णेश्वरचा काय संबंध? मी प्रश्नार्थक मुद्रेने साहेबांकडे पहात असतांनाच विस्ताराने साहेबांनी मला सांगितल्यावर सर्व उलगडा झाला .

दिल्लीतील एक वरिष्ठ आय. ए. एस. अधिकारी श्री. त्रिपाठी रविवारी श्रावणाच्या महिन्याचे औचीत्य साधून घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाला अभिषेक करण्यासाठी येणार होते. ते रविवारी सकाळी चारच्या दरम्यान घृष्णेश्वराला अभिषेक करतील, त्यापूर्वी त्या मंदिरात कोणाचाही अभिषेक होता कामा नये अश्या सूचना तेथील पुजाऱ्याला देण्याची कामगिरी माझ्यावर सोपवण्यात आली. त्याकरता मी शनिवारीच वेरूळ-घृष्णेश्वरला जाऊन पूजेची व अभिषेकाची पूर्व-तयारी करण्याचे आदेशही साहेब मला द्यायचे विसरले नाही. शनिवार, रविवार दोन दिवसांकरिता दोन सूट मंदिराजवळच असलेल्या सरकारी विश्रामगृहामध्ये आरक्षित करण्यात आले, कारण शनिवारी दिल्लीचे अधिकारी त्या विश्रामगृहात मुक्कामाला येणार होते. त्यांच्या कार्यक्रमाची रूपरेषा साधारणतः अशी होती, शनिवारी रात्री उशिरा ते विश्रामगृहात मुक्कामाला येतील, रविवारी भल्या पहाटे विश्रामगृहात अंघोळ करून जवळच असलेल्या मंदिराकडे अभिषेक करण्याकरता ऑफिसच्या गाडीने जातील. मला अशीही सूचना करण्यात आली होती की साहेब तर स्नान करून सोवळे नेसूनच निघतील, परंतु मी व गाडीच्या ड्रायव्हरनेही त्यांच्याबरोबर जाण्यापूर्वी स्नान करणे आवश्यक होते, एवढेच नव्हे तर मी अथवा गाडीच्या ड्रायव्हरने पायात कुठल्याही प्रकारचे जोडे अथवा चपला घालू नये अशी ताकीद देण्यात आली होती.

मी मला दिलेल्या सूचनेप्रमाणे गाडी घेऊन मोठ्या जड अंतकरणाने वेरूळ-घृषणेश्वरकडे शनिवारीच प्रयाण केले. पूजेला येणाऱ्या पुजाऱ्याला संध्याकाळीच योग्य त्या सूचना दिल्या. शनिवार रविवारची सुटी अश्या रीतीने वाया गेली याचे दुःख तर मनात होतेच, परंतु कार्यालयात एवढे कर्मचारी असताना माझ्याच नशिबी ही बला का आली या विचाराने मी जास्त जास्त निराश होत होतो. थोडे संशोधन केल्यावर लक्षात आले की साहेबांबरोबर "एस्कॉर्ट" करता येणारी व्यक्ती त्यांना पूरकच असावी असा त्यांचा दंडक होता. साहेब सपत्नीक येतील की एकटेच याची माहिती मला या धावपळीत घेता आली नाही .

शनिवारीं रात्री मी व माझा ड्रायव्हर विश्रामगृहात येऊन पडलो, पडलो कशाचे, उद्याची चिंता करीत अंथरुणावर कलंडलो. अधिकारी फारच तामसी व शिस्तीचे भोक्ते, धार्मिक असल्यामुळे मनावर एक प्रकारचे दडपण होते. मध्यरात्रीच्या सुमारास अधिकाऱ्याची स्वारी विश्रामगृहात दाखल झाली. त्यांनी आम्हाला बोलावून सकाळी चारच्या सुमारास स्नान करून तयार राहण्याच्या सूचना दिल्या व ते आपल्या सुटमधे रवाना झाले. त्यांच्या हातामध्ये असलेल्या एका बाटलीकडे आमचे लक्ष गेले. लहान बाटलीत पिवळ्या-लाल रंगाचे दारूसारखे द्रावण पाहून आम्हाला आश्चर्य वाटले, पण काही क्षणातच जेंव्हा त्यांनी सुटमधे प्रवेश करण्याअगोदर ते द्रावण सुटमधे शिंपडले तेव्हा खुलासा झाला की ते द्रावण म्हणजे गोमूत्र होते. अधिकाऱ्याने सूटचा वापर करण्यापूर्वी सूट गोमुत्राने पवित्र करुन घेतला. दिवसभराच्या श्रमाने थोडा वेळ डोळा लागला खरा पण, दडपणाने झोप काही लागली नाही.

पहाटे चारच्या सुमाराला ते अधिकारी सोवळे नेसून अंगावर शाल घेऊन गाडीकडे वळले. मला व माझ्या ड्रायव्हरला पॅन्ट -शर्ट मध्ये उगीचच अवघडल्यासारखे वाटले. मी घृष्णेश्वरच्या मंदिरात जरी पूजेची तयारी करून ठेवली होती तरी

अधिकाऱ्याच्या हातात पूजेचे ताट पाहून मला आश्चर्य वाटलेच पण कोणाचीही तमा न बाळगता एवढा मोठा अधिकारी डोक्यावर शेंडी राखतो, कपाळावर आडवे गंध लावून पूजेला जातो याचे आश्चर्य वाटले. मी ड्रायव्हरच्या बाजूच्या सीटवर जाऊन बसलो आणि ते अधिकारी मागच्या सीटवर जाऊन बसले आणि गाडी घृष्णेश्वरच्या दिशेने निघाली. गाडीचा वेग काही फार नव्हता, १०-१५ मिनिटात आम्ही मंदिरात पोहोचायास हरकत नव्हती. पावसामुळे रस्ता ओला झाला होता त्यामुळे गाडी वेगात नव्हती. इतक्यात गाडीचा वेग कमी झाला. रस्त्यात चिरडल्या गेलेल्या एका प्राण्याच्या मृत शरीरावरुन गाडी न नेण्याच्या प्रयत्नांत शेवटी गाडी त्या प्राण्याच्या शरीरावरून गेलीच. मागे बसलेल्या अधिकाऱ्याच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. कदाचित अँबॅसेडर गाडी शिवाय दुसरी गाडी असती तर त्यांना नीटसे दिसलेही नसते. त्यांनी ताबडतोब करड्या आवाजात "ड्रायव्हर" अशी हाक मारली आणि गाडी पुन्हा विश्रामगृहाकडे घेण्याची त्याला त्याच उंच आवाजात आज्ञा दिली.

परिस्थिती माझ्या लक्षात आली. कडक सोवळे पाळणाऱ्या साहेबांची मृत प्राण्याच्या शरीरावरुन गाडी गेल्याने शुचिर्भूतता भंग पावली. त्यांनी पुन्हा स्नान करण्याकरता गाडी विश्रामगृहाकडे वळविण्याचे आदेश दिले. विश्रामगृहात येताच त्यांनी गाडीतून जवळ जवळ  उडीच मारली आणि सूटकडे जातांना आमच्याकडे न पाहता आम्हालाही पुन्हा अंघोळी करण्याच्या सूचना दिल्या. दोनवेळा अंघोळ करण्याच्या दृष्टिकोनातून आम्ही कपडे आणले नव्हतेच त्यामुळे आमची फार पंचाइत झाली ओले कपडे घालूनच आम्ही पाचच मिनिटात बाहेर आलो. थोड्याच वेळात ते अधिकारीही बाहेर आले. त्यांनी त्यांचे सोवळे, शाल,  सर्व काही बदललेले दिसले. मला याचे आश्चर्य वाटले की या  अधिकाऱ्याकडे सोवळ्याचे दोन दोन सेट कसे? नंतर कळले की हे अधिकारी संध्याकाळी औंढा -नागनाथ येथे जाऊन अभिषेक करणार आहेत. गाडीत बसता बसता "देखके चलाना ड्रायव्हर" असा कडक दम भरण्यास ते विसरले नाही.

दहा  मिनिटातच आम्ही घ्रष्णेश्वर मंदिरात पोहोचलो. पुजारी तयारच होते, त्यांना अधिकाऱ्याशी जास्त बडबड न करण्याच्या  सुचना देऊन आम्ही भालदार-चोपदारा सारखे मंदिराच्या गाभाऱ्याच्या तोंडाशी उभे राहिलो.  गाभाऱ्यात यथासांग पूजा व अभिषेक चालू होता. भरपूर ताजी फुले, पत्र्या, बेल पाहून अधिकारी खुश दिसत होते, इतक्यात गाभाऱ्यातून "चिनी, चिनी" असा आवाज ऐकू आला. पूजेच्या शेवटी प्रसादाबरोबर साखरेचा नैवेद्य दाखविण्याचा त्यांचा मानस असावा, म्हणून  त्यांनी चिनी आहे का असे विचारले. पुजाऱ्याच्या "चिनी" हा शब्द काही लक्ष्यात येईना. तो गोंधळून गेला. ते अधिकारी "अरे भाई, चिनी - चिनी" असे त्याला सांगत होते. यावेळी का कोणास ठाऊक पण मला मात्र १९६१ मधल्या "हिंदी-चीनी भाई भाई"  या घोषवाक्याची आठवण झाली. शेवटी मीच लगबगीने गाभाऱ्यात गेलो व पुजाऱ्याला सांगितले की त्यांना साखर हवी आहे. गाभाऱ्यात किंवा  पूजेच्या साहित्यात साखरेचा समावेश नव्हता. पुजाऱ्याने त्यांना "शक्कर नही है !" असे सांगितले तेव्हा ते अधिकारी संतापलेले वाटले. मी भीतभीतच यांना पृच्छा केली की  पुजाऱ्याच्या घरून मी साखर आणू का ? त्यावर त्यांनी "हां, भाई! लेके आना जल्दीसे" असे काहीश्या घुश्यातच म्हणाले. मी ताबडतोब ड्रायव्हरला बरोबर घेऊन पुजाऱ्याच्या घरी गेलो आणि साखर उपलब्ध केली. सत्वरित उपलब्ध झाल्यामुळे अधिकारी बरेच शांत झाल्यासारखे वाटले .

थोड्या वेळातच पुजाऱ्यासह ते बाहेर आले व आम्हाला तीर्थ देऊन पुजाऱ्याला दक्षिणा घेण्याकरता पाचारण केले. घवघवीत दक्षिणा मिळाल्यामुळे पुजाऱ्याचा चेहरा खुलला होता, तो आमचा निरोप घेऊन परतला. आम्हीही विश्रामगृहात परत आलो. पूजाअर्चा झाल्यानंतर आमचे सोबत नाश्ता नाही तर  निदान चहा -पाणी तरी घेतील अशी आमची अपेक्षा होती, मी तसे त्यांना विचारलेही, परंतु त्यांनी नकार दिला. बरोबर आणलेल्या गाडीकडे निघाले असतांना आम्हाला "थँक यु" म्हणण्यास ते विसरले नाही .

त्यांची गाडी दृष्टीआड होताच आम्ही सुटकेचा सुस्कारा सोडला आणि घ्रष्णेश्वराचे मनातच मनःपूर्वक दर्शन घेतले. जवळच्याच टपरीवर जाऊन चहा भज्यावर ताव मारण्याचा मोह आम्हा  दोघांनाही आवरता येणे शक्य नव्हते. घरचेही वेध लागले होते. अचानक रद्द झालेल्या आमच्या वीक-एंडच्या कार्यक्रमामुळे घरी काय वाढून ठेवले आहे याचा अंदाज घेत आम्ही घर जवळ केले.

- **बाळकृष्ण पाडळकर**

# The Future of Coatings



## Various Paint Technologies

- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More...

## GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS



Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market

- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements

Dhake Industries

Please contact us for more information ▸▸▸

**Global Headquarters**
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

गणपती बाप्पा मोरया

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ